www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 341   बुधवार दि. 27 ऑगस्ट २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

## शेतकरी कामगार पक्ष आयोजित भव्य पदाधिकारी पद नियुक्ती सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल येथे शेतकरी कामगार पक्ष आयोजित भव्य पदाधिकारी पद नियुक्ती सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात शेतकरी कामगार पक्षाच्या तलोजा फेज-२च्या अध्यक्षा तसेच दीक्षा फाउंडेशनच्या अध्यक्षा सौभाग्यवती दीक्षा दिलीप जाधव यांची शेतकरी कामगार पक्ष पनवेल महानगरपालिका जिल्हा महिला उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

निवडपत्र शेकापचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित महिला उपाध्यक्ष दीक्षा जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना, शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीला पनवेल परिसरात



भक्कमपणे उभे करून मोठ्या प्रमाणावर विस्तार घडवून आणू, असा विश्वास व्यक्त केला. या सोहळ्याला पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान, आदर्श लाईव्ह न्यूज चॅनल तर्फे दीक्षा जाधव यांना भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## उलवे नोडच्या राजाचे वाजत गाजत आगमन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

उलवे नोडच्या राजाचे 25 ऑगस्ट रोजी वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात आगमन झाले. यावेळी भक्तगण तल्लीन होऊन बाप्पांच्या आगमनात नाचत होते.



उलवे नोड सामाजिक मित्र मंडळ आणि महिला मंडळ आयोजित उलवे नोडचा राजाचा आगमन सोहळा ढोल ताशांच्या गजरात 25 ऑगस्ट रोजी करण्यात आला. 27 ऑगस्ट ते सहा सप्टेंबरपर्यंत उलवे नोडचा राजाचे दर्शन नागरिकांना घेता येणार आहे. यावेळी सोबत वैष्णोदेवीचे दर्शन देखील नागरिकांना घेता येणार आहे. बाप्पांसाठी भव्य देखावा उलवे, सेक्टर 20, शगुन बिल्डिंग जवळ या ठिकाणी उभारण्यात आला आहे. उलवे नोड शेकाप अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी हे आयोजन केले आहे. संध्याकाळी बाप्पांचे स्वागत जल्लोषात करण्यात आले. यावेळी उलवे नगरी दुमदुमून गेली. उलवे नोडच्या राजाचे आगमन झाल्यानंतर बाप्पांची पहिली झलक कॅमेरात टिपण्यासाठी गणेश भक्तांनी गर्दी केली होती. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. उलवे नोडच्या राजाचे हे दहावे वर्ष असून नागरिकांनी बाप्पांच्या दर्शनाला यावे असे आवाहन शेकाप अध्यक्ष उलवे नोड, प्रशांत पाटील यांनी केले आहे.

## लालबागच्या राजा मंडळाने घेतलेल्या मोठ्या निर्णयाला BMC आणि मुंबई पोलिसांचा विरोध; प्रकरण डायरेक्ट मुख्यमंत्र्यांकडे गेले

लालबागच्या राजा मंडळाने घेतलेल्या मोठ्या निर्णयाला BMC आणि मुंबई पोलिसांचा विरोध; प्रकरण डायरेक्ट मुख्यमंत्र्यांकडे गेले

4मुंबईतला सुप्रसिद्ध गणपती कोणता तर सर्वांच्या तोंडी पहिलंच नाव येतं ते म्हणजे लालबागच्या राजाचं. मुंबईतील हे सर्वात प्रसिद्ध गणेश मंडळ विविध वादांमुळे देखील नेहमीच चर्चेत असते. यंदा देखील लालबागच्या राजाचे दर्शन सुरु होण्याआधीच वादाला सुरुवात झाली आहे. लालबागच्या राजा मंडळा घेतलेल्या मोठ्या निर्णयाला BMC आणि मुंबई पोलीसांचा विरोध केला आहे. महाप्रसादावरुन हा वाद सुरु झाला आहे. लालबागच्या राजाच्या महाप्रसादाला मुंबई पोलीस आणि मुंबई महापालिकेने विरोध केला आहे. यामुळे लालबागच्या राजाच्या भक्तांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. लालबागचा राजा आणि अंबानींकडून दर्शनासाठी येणाऱ्या 1 लाख भाविकांना रोज महाप्रसाद देण्यात येणार होतालालबागच्या राजासह चिंतामणी, गणेश गल्ली तसेच इतर मंडळांच्या गणेश दर्शनासाठी देखील भाविक येतात. गणेशोत्सवादरम्यान लालबाग परिसरात मोठी गर्दी असते. वाढलेली गर्दी लक्षात घेता येथे महाप्रसादाचे आयजोन केल्यास लोकांची गर्दी आणखी वाढू शकते. यामुळे गर्दीचे नियोजन करताना सुरक्षा तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो असे कारण देत मुंबई पोलिसांनी लालबागच्या राजाच्या




महाप्रसादाला परवानगी नाकारली आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या कोर्टात हे प्रकरण गेले आहे. फडणवीसांनी सीपी देवेन भारती आणि पालिका आयुक्त गगराणी यांना परवानगी द्यावी म्हणून पत्र दिलं आहे. तरीही मुंबई पोलीस आणि पालिका आयुक्तांकडून अद्याप परवानगी देण्यात आलेली नाही.

दरम्यान, लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणीच्या दर्शनाला जाण्यासाठी गणेश भक्त करी रोड आणि चिंचपोकळी स्थानकाचा सर्वाधिक वापर करतात. त्यामुळे या स्थानकात चढणाऱ्या आणि उतरणाऱ्या प्रवाशांसाठी विशेष सोय केली आहे. स्थानकांवर अतिरिक्त तिकीट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ३० मोबाइल-यूटीएस यंत्रणा वितरित केल्या आहेत. चिंचपोकळी, करी रोड, भायखळा, परळ, दादर व कॉटन ग्रीन स्थानकांवर 27 ऑगस्टपासून दहा दिवसांसाठी मोबाईल-यूटीएस ॲ प प्रचार पथक तैनात करण्यात येणार आहे.

**1. लालबागचा राजा कोणता आहे?**

लालबागचा राजा हा मुंबईतील सर्वात प्रसिद्ध गणेश मंडळ आहे, ज्याचे नाव गणपती भक्तांमध्ये अग्रस्थानी आहे. हे मंडळ आपल्या भव्य गणेशमूर्ती आणि उत्सवासाठी प्रसिद्ध आहे.

**2. लालबागच्या राजाच्या यंदाच्या गणेशोत्सवात कोणता वाद निर्माण झाला आहे?**

लालबागच्या राजा मंडळाने महाप्रसादाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला होता, परंतु याला मुंबई पोलीस आणि बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) यांनी विरोध केला आहे. यामुळे भक्तांमध्ये नाराजी पसरली आहे.

**3. महाप्रसादाला विरोध का केला गेला आहे?**

गणेशोत्सवादरम्यान लालबाग परिसरात मोठी गर्दी असते. महाप्रसादाचे आयोजन केल्यास गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे कारण मुंबई पोलिसांनी दिले आहे.

## गणेशोत्सवाचे आगमन व आवाहन - पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची शाडू मातीही इको- फ्रेंडली नाही- अभ्यासकांचे अध्ययन

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी :-**
**योगेश पालोदकर सिल्लोड-**

उदया पासुन महाराष्ट्रा च्या घराघरात चैतन्य अवतरणार. राज्यात 60 लाखाहून अधिक घरघुती व सार्वजनिक गणेश मूर्ती स्थापित केल्या जातात. एकट्या मुबंईतच 5 लाखहून अधिक गणपती मूर्ती स्थापित होतात. गौरीची संख्या वेगळी.हे विघ्नहर्त्याचे हे चैतन्य नकळत पर्यावरनावर, जल परीसंस्थेवर विघ्न आणत आहेत हे अलीकडील काळात शासन, न्याय व्यवस्था, पर्यावरण अभ्यासक, निसर्ग रक्षक यांच्या निदर्शनास आले आहे व त्या दृष्टीने जनजागृती, नियम, बंधने व उपाययोजना करण्यास अनेक वर्षा पासुन सुरुवात ही झाली आहे, इको - फ्रेंडली गणेशोत्सव ही संकल्पना रुजू लागली आहे व नागरिक व गणेश भक्त ही यास सकारात्मक प्रतिसाद देत आहे. शाडू माती चे गणपती हे प्लास्टर ऑफ पॅरिस ला पर्याय म्हणून समोर येत असतांनाच नव्याने झालेल्या अभ्यासातून धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पुण्यातील जीवित नदी ही संस्था व सिल्लोड येथील पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी ही यावर अध्ययन केले आहे.

**शाडू माती येते निसर्गातून/ खाणीतुन मात्र....**

शाडू माती ही मुख्यतः गुजरात मधून निर्मित होते. तिला आर्ट क्ले - कले साठी वापरली जाणारी प्रक्रिया केलेली माती म्हटलं जाते. या मातीसाठी मोठ मोठे डोंगर व नदीचे खोरे खोदले जात आहे यात ही निसर्गाची हानी होत आहे. सदर मातीची जल रोधक क्षमता वाढवण्यासाठी, ती पासुन निर्मित मूर्ती / इतर



वस्तू दीर्घ काळ टिकून राहावी व हवा तसा आकार देता यावा म्हणून तीत सिलिका, मॅंगनीज, मॅग्ने सियम, आयर्न, क्वार्टझ, आदी जड धातूचे संयुगे व इतर रसायने मिश्रित करून ती 1000 ते 1200 से.इतक्या उच्च तापमानस भाजली तेव्हा. त्यांनतर ही शाडू व्यावसायिक उपयोगात येते.

***प्लास्टर ऑफ पॅरिस व रासायनिक रंग जलसंस्थेस व पर्यावरणास हानिकारक -**

राज्यात 97 टक्के गणपती मूर्ती या आज ही अगदी कोर्टाने यावर निर्बंध आणल्या वर देखील पी ओ पी पासुन निर्मित निर्माण होतात. 6 फुटा पेक्षा उंच मूर्ती नदी, समुद्र, बारव, विहीर, तलाव आदी नैसर्गिक जल स्त्रोतात विसर्जित करू नये असे निर्देश सर कार व कोर्टाचे आहेत. तिचे विसर्जन कृत्रिम पाणवठे मध्ये करने क्रम प्राप्त आले. पी ओ पी ही जीप्सम पासुन निर्माण केली जाते व तीचा सिमेंट उद्योगात वापर होतो. ती पाण्यात लवकर विरघळत नाही व ती जल संस्थे वर घातक परिणाम करते. मूर्ती रंगकामात मर्क्यूरी, कॅडनियम, अर्से निक, लीड, क्रॉमियम, झिंक, कोबाल्ट, अँटी मनी व्हाईट, बेरियम, लिथोल रेड कार्बन व ईतर रसायने वापरली जातात ती जल जीव संस्था, नदी काठची शेती व मानवी व वन्यजीवनास हानिकारक ठरते. एकट्या मुंबईत या वर्षी 44 लाख टन पी ओ पी या उत्सव काळात वापरले गेले आहे.

*** शाडू मातीचे जल संस्थे वर दुष्प्रभाव**

आपल्या शेतीतील, नदी किनारी असलेल्या माती पेक्षा पूर्णपणे वेगळी गुणधर्म व रचनेने वेगळी असून ती माती अतिशय चिकणी असते. ती पाणी धरून ठेवते. जेव्हा शाडू मातीच्या मूर्ती पाण्यात विसर्जित होतात तेव्हा त्या मूर्ती पाण्यात विसर्जित होतात. मात्र मूर्ती विसर्जीत होते पण ती माती पाण्यात विरघळत नाही. तिचा साका / राब हा नदी तळाश जमतो. वाळू सोबत मिळून तो नदीच्या अथवा जलाशयाच्या तळाला जाऊन बसतो. त्यामुळे पाणी जमिनीत पाझरणे थांबते. भुजल पुनर्जीवन प्रक्रियेत बाधा बनते. तळाची छिद्र बंद होतात. हीच माती जेव्हा नदी काठच्या शेतात जाते तेव्हा ही मातीची पोरोसिटी कमी होते व भुजल पुनर्जीवन होत नाही.या शाडू मातीच्या मूर्तीला रासायनिक रंग ही दिले जातात.

**-डॉ. संतोष पाटील**
पर्यावरण अभ्यासक, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड

**गणपती स्थापना ही कशी करू शकता -**

आता बऱ्याच ठिकाणी धातू ची मूर्ती बसवतात. ती मूर्ती विसर्जन दिनी फक्त हलवून परत तशीच्या तशी ठेवून दिली जाते. सोबत छोटी सुपारी गणेशा ही स्थापन करतात व त्या सुपारीचे किंवा मातीच्या अगदी **पान २ वर**

**पान १ वरुन** छोट्या गणपतीचे प्रतिकात्मक विसर्जन घरातील कुंडी अथवा इतर ठिकाणी करण्याचा चांगला प्रघात पर्यावरण स्नेही गणपती भक्त अवलंबवत आहे. फक्त माती, माती व देशी गायीचे गोमेय, हळद, आदी पासुन ही गणेश मूर्ती अनेक ठिकाणी स्थापित होत आहे ही आनंदाची बाब आहे

**- शैलजा देशपांडे**
**जल अभ्यासक, जीवित नदी फौंडेशन, पुणे.**

श्री गणपतीची निर्मिती व धर्म शास्त्र काय सांगते.- माता पार्वती यांनी माती, हळद व अंगाचा घाम यापासून श्री गणपती देवाची निर्मिती व केली व त्यात प्राण फुंकला. माती हे एक महत्वाचे पंच तत्व असून गणपती ही माती या पंच तत्व घटका पासुन निर्मित असून ते माती चे च असावे व माती च विसर्जित व्हावे. जल संपून जाईल मात्र माती चिरकाल टिकते व माती माती सोबत एकरूप होऊन जाते. धर्म शास्त्र सांगते कि ती मूर्ती अंगठ्या एव्हढी च असावी व पार्थिव असावी ( पंचतत्व ). म्हणून मूर्ती मोठीच असावी असे नाही.

डॉ. पाटील यांचा एक लक्षवेधी प्रयोग - ओली शाडू माती एका चाळणीत पूर्ण पसरवून टाकल्या वर त्यात काही वेळाने पाणी टाकल्यावर पाण्याचा एक थेंब ही गळाला नाही.यावरून ती पाणी पाझरू देत नाही हे निरीक्षणास येते.









## नवसपूर्ती झाल्याने ॲड.कोमल मोहनीश भोईर यांनी दिली गणपती बाप्पाची मुर्ती भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**




केलेला नवस पूर्ण झाल्याने त्याची उतराई म्हणून ॲड. कोमल मोहनीश भोईर आणि उद्योजक मोहनीश अनंत भोईर यांनी शिवनगर येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला गणपती बाप्पाची मुर्तीची भेट देवून आगळ्यावेगळ्या पद्धतीने नवस फेडला आहे.
शिवनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अंधेरी (प.) येथील गणरायाकडे भोईर कुटुंबियांनी नवस बोलला होता. त्या नवसाची पूर्तता झाल्याने यंदाच्या वर्षी या मंडळाची मुर्ती भोईर कुटुंबियांच्यामार्फत देण्यात आली आहे. यावेळी मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक राजू नेटके, अध्यक्ष विवेक घाडी, कार्याध्यक्ष प्रतिक मालाडकर, सचिव गुरुसनाथ शेट्टी, खजिनदार हरिष एडला, उपसचिव अक्षय सुर्वे व शशांक काकडे, उपाध्यक्ष विशाल पवार व अरुण कदम, उपखजिनदार रोहित कालप, रितेश शेलार यांनी या मुर्तीची थाटामाटात आगमन करून भोईर कुटुंबियांचे आभार मानले आहेत.

# डॉ.सिद्धार्थ तुरकर यांची अपोलोत नियुक्ती

## डॉ.तुरकर सॉलिड ऑर्गन कर्करोग, क्लिनिकल चाचण्या आणि पॅलिएटिव्ह ऑन्कोलॉजी मधील तज्ज्ञ

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, प्रतिनिधी**

२६ ऑगस्ट २०२५: अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने प्रसिद्ध ऑन्कोलॉजिस्ट डॉ. सिद्धार्थ तुरकर यांची वैद्यकीय ऑन्कोलॉजी सल्लागार म्हणून नियुक्ती करून कर्करोग देखभाल सेवा आणखी वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. दोन दशकांहून अधिक काळाचा समृद्ध अनुभव गाठीशी असलेले डॉ. तुरकर यांनी टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये देखील काम केले आहे. त्यांच्याकडे सॉलिड ऑर्गन ट्यूमरच्या व्यवस्थापनात, इम्युनोथेरपी प्रोटोकॉलमध्ये अग्रणी आणि पुराव्यावर आधारित, वैयक्तिकृत उपचार योजना चालविण्याची सखोल कौशल्ये आहेत. त्यांची नियुक्ती




करून, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने पश्चिम भारतात अत्याधुनिक, रुग्ण-केंद्रित ऑन्कोलॉजी काळजी प्रदान करण्याच्या आपल्या वचनबद्धतेमध्ये एक धोरणात्मक पाऊल उचलले आहे.
प्रतिष्ठित टाटा मेमोरियल हॉस्पिटल (डीएम - मेडिकल ऑन्कोलॉजी) मधून पदवीधर असलेले डॉ.तुरकर यांनी यापूर्वी एमएमआय नारायण सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल आणि बाल्को मेडिकल सेंटर, रायपूर सारख्या उच्च संस्थांमध्ये ऑन्कोलॉजी सेवांचे नेतृत्व केले आहे. बाल्को मेडिकल सेंटरमध्ये डीएनबी मेडिकल ऑन्कोलॉजी कार्यक्रम सुरू करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि कर्करोग तज्ज्ञांच्या पुढील पिढीला मार्गदर्शन केले आहे. युरोपियन सोसायटी फॉर मेडिकल ऑन्कोलॉजी (ईएसएमओ) आणि युरोपियन हेमॅटोलॉजी असोसिएशन (ईएचए) द्वारे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षित आणि प्रमाणित, डॉ. तुरकर यांच्या आवडीच्या क्षेत्रांमध्ये इम्युनोथेरपी, टार्गेटेड थेरपी, पॅलिएटिव्ह ऑन्कोलॉजी आणि मर्यादित संसाधनांमध्ये क्लिनिकल प्रोटोकॉल डेव्हलपमेंट यांचा समावेश आहे. हार्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये त्यांचे सुरु असलेले कार्यकारी प्रशिक्षण, आयआयएम रायपूर आणि आयआयएम बंगळुरूकडून मिळालेले नेतृत्व प्रमाणपत्र हे औषध आणि व्यवस्थापन या दोन्ही क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न दर्शवितात.
डॉ.सिद्धार्थ तुरकर, मेडिकल ऑन्कोलॉजी कन्सल्टंट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील प्रतिष्ठित टीममध्ये सामील झाल्याचा मला अभिमान आहे. ऑन्कोलॉजीमधील जलद प्रगतीसह, रुग्णांना अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधन-आधारित प्रोटोकॉलद्वारे समर्थित मल्टी-डिसिप्लिनरी देखभाल सेवांची उपलब्धता असणे अत्यावश्यक आहे. केवळ आजारावरील उपचारच नव्हे, तर रुग्णांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या भावनिक आणि मानसिक गरजा पूर्ण करणाऱ्या समग्र, वैयक्तिकृत उपचार धोरणे प्रदान करून कर्करोग देखभालीमध्ये उत्कृष्टतेच्या अपोलोच्या वारशात योगदान देण्यास मी उत्सुक आहे."
असंख्य पीयर-रिव्युड पब्लिकेशन्स, राष्ट्रीय स्तरावरील सादरीकरणे आणि संपादकीय योगदान देणारे सक्रिय संशोधक, डॉ. तुरकर हे त्यांच्या पुराव्यावर आधारित दृष्टिकोन आणि रुग्णांप्रती सहानुभूती यासाठी भारतातील ऑन्कोलॉजी वर्तुळात त्यांना अतिशय आदरणीय मानले जाते. छत्तीसगडमधील त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी, त्यांना अलीकडेच माय हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्ड २०२४, वैद्यकीय सन्मान आणि सार्वजनिक कर्करोग सेवेतील प्रभावी योगदानाबद्दल एमिनेन्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे.

## बबनराव बारगजे यांची सलग चौथ्यांदा भाजपा भटके विमुक्त आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



आमदार प्रशांत दादा ठाकूर यांचे विश्वासू सहकारी म्हणून बबनराव बारगजे यांची ओळख आहे . भाजपाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी काल विविध मोर्चा , सेल जिल्हाध्यक्षांची निवड जाहीर केली . या सर्व निवडीमध्ये एक निवड लक्ष वेधून घेणारी होती ती म्हणजे श्री बबन बारगजे यांची , कारण सलग चौथ्यांदा त्यांची निवड करण्यात आलेली आहे . लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा आशीर्वाद व आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा सच्चा कार्यकर्ता म्हणून बबन बारगजे यांची ओळख आहे . 2017 पासून भाजपा भटके विमुक्त आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी सलग चौथ्यांदा त्यांची निवड जाहीर झालेली आहे त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे . कामाशी प्रामाणिक असलेला हा माणूस नेहमी लोकांच्या संपर्कात असतो त्यामुळे नोकरी करत असताना सुद्धा पक्षाला ते वेळ देतात . त्यांच्या या कामाची पोचपावती म्हणून जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी त्यांना पुन्हा संधी दिली . याबद्दल बोलताना बबन बारगजे यांनी सांगितले की मी माझे काम करत राहतो दुसऱ्यांचा हेवादेवा नंतरचा समाजातील कोणतीही व्यक्ती माझ्याकडे आल्यानंतर प्रामाणिकपणे त्यांचं काम करण्याचा प्रयत्न करतो . त्यामुळे ही संधी मिळते . मला आमदार प्रशांत दादा ठाकूर व अविनाश कोळी यांनी परत या पदावर नियुक्त केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो व माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविन असा शब्द देतो . माझ्या गोरगरीब भटक्या विमुक्त समाजातील ५२ जाती जमाती मधील व्यक्तींना न्याय देण्याचे काम मी प्रामाणिकपणे करेल . भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी साहेब यांच्या सबका साथ सबका विकास व सबका विश्वास प्राप्त करण्याचे काम करून दाखवीन . मी ज्या मंडळात काम करतो त्या कळंबोली मंडळातील माझे सर्व सहकारी सर्वश्री मंडळ अध्यक्ष अमर पाटील माजी अध्यक्ष रवी शेठ पाटील माजी नगरसेवक बबन मुकादम अशोक मोटे व सर्व सहकाऱ्यांची साथ मला नेहमी असते त्यामुळे काम करण्याचा उत्साह वाढतो याबद्दल मी सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो .

# कंचली तांड्यातील लाकडी गणपती दर्शनासाठी भाविकांची उद्यापासून मोठी गर्दी

**(1982 पासून परंपरा, 2011 पासून नवसा पावणाऱ्या लाकडी गणपतीची स्थापना)**

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : किनवट विशाल भालेराव**

किनवट तालुक्यातील कंचली तांडा हे गाव आज संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय बनले आहे. कारण, येथे इ.स. 1982 पासून सुरु झालेली गणपती स्थापना ही आजही भक्तीभावाने आणि उत्साहाने पारंपरिक पद्धतीने साजरी होत आहे. विशेष म्हणजे, इ.स. 2011 मध्ये येथे नवसा पावणाऱ्या लाकडी गणपतीची स्थापना करण्यात आली. त्या दिवसापासून कंचली तांडा हा भक्तांसाठी श्रद्धेचं आणि विश्वासाचं केंद्रस्थान बनला आहे.



दरवर्षी गणपती उत्सव काळात येथे हजारो भाविक दर्शनासाठी मोठ्या संख्येने येतात. भक्तांचा अनुभव असा आहे की येथे स्थापन केलेल्या लाकडी गणपतीच्या चरणी मनोभावे प्रार्थना केली, नवस बोलला तर तो नक्कीच पूर्ण होतो. म्हणूनच, परिसरातील नवस फेडणारे, शेतकरी, विद्यार्थी, महिला, व्यापारी असे सर्वजण कंचली तांड्याच्या गणपतीला विशेष मान देतात.

**उत्सवाची भक्तीमय आणि सांस्कृतिक रंगत**

कंचली तांड्यातील गणपती उत्सव हा फक्त धार्मिक कार्यक्रम न राहता, तो एक सामाजिक, सांस्कृतिक आणि भक्तीमय सोहळा झाला आहे. मंडपाची आकर्षक आरास, विविध प्रकारच्या फुलांच्या सजावटी, प्रकाशयोजना आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात भाविकांचे स्वागत केले जाते. उत्सव काळात भजन, कीर्तन, सांस्कृतिक स्पर्धा, पालखी सोहळे आयोजित केले जातात.
गणपतीच्या दर्शनासाठी सकाळपासूनच रांगा लागतात. महिला मंडळे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. मुलांसाठी खेळ, शैक्षणिक कार्यक्रम, तरुणांसाठी स्पर्धा यामुळे गणपती उत्सवाला संपूर्ण गावाचा मेळावा असे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**कंचली गावाची ओळख भक्तीने उजळली**

शिवणीपासून अवघ्या 5 किलोमीटर अंतरावर असलेले कंचली गाव,हे पाळज नंतर आज संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. सहज उपलब्ध असलेला रस्ता, गावकऱ्यांची आदरातिथ्यशील वृत्ती आणि गणपतीच्या चरणी मिळणारा आत्मिक आनंद यामुळे भाविकांचे येथे वारंवार येणं होत असतं.
उत्सव काळात गावात भक्तीमय वातावरण, लोकांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि श्रद्धा पाहून कुणाच्याही मनाला समाधान मिळते. अनेक भाविकांनी अनुभव कथन केले आहेत की, "कंचलीच्या लाकडी गणपतीच्या चरणी मागितलेली मनोकामना नक्कीच पूर्ण होते."

**संपूर्ण तालुक्यातील भाविकांसाठी आवाहन**

येत्या गणपती उत्सव काळात कंचली तांड्यातील लाकडी गणपतीच्या दर्शनासाठी परिसरातील तसेच दूरवरच्या भाविकांनी मोठ्या संख्येने यावे, असे आवाहन ग्रामस्थ आणि गणपती मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.
कंचली तांड्याचा गणपती उत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून श्रद्धा, परंपरा आणि एकतेचे प्रतीक आहे. त्यामुळे एकदा तरी या लाकडी गणपतीचे दर्शन घ्यावे आणि भक्तीमय वातावरणाचा अनुभव घ्यावा.

## शेकाप कामोठे विभाग अध्यक्षपदी अमोल शितोळे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शेकापच्या कामोठे विभाग अध्यक्षपदी अमोल शितोळे यांची नुकतीच नियुक्ती पक्षाचे नेते मा.आ.बाळाराम पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून करण्यात आली.
अमोल शितोळे यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक व राजकीय कामाची दखल वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली व त्यांना कामोठे विभाग अध्यक्षपदाच्या नियुक्तीचे पत्र कार्यालयीन चिटणीस देवेंद्र मढवी व चिटणीस प्रकाश म्हात्रे यांच्या माध्यमातून शेकाप नेते मा.आ.बाळाराम पाटील व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आले. यावेळी बोलताना शेकाप वाढविण्यासाठी पूर्णतः प्रयत्न करणार असून तळागळातील लोकांना पक्षाच्या माध्यमातून न्याय मिळवून देवू, असे मत नवनिर्वाचित कामोठे विभाग अध्यक्ष अमोल शितोळे यांनी व्यक्त केले आहे.

## उलवे नोडच्या राजाचे वाजत गाजत आगमन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

उलवे नोडच्या राजाचे 25 ऑगस्ट रोजी वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात आगमन झाले. यावेळी भक्तगण तल्लीन होऊन बाप्पांच्या आगमनात नाचत होते.
उलवे नोड सामाजिक मित्र मंडळ आणि महिला मंडळ आयोजित उलवे नोडचा राजाचा आगमन सोहळा ढोल ताशांच्या गजरात 25 ऑगस्ट रोजी करण्यात आला. 27 ऑगस्ट ते सहा सप्टेंबरपर्यंत उलवे नोडचा राजाचे दर्शन नागरिकांना घेता येणार आहे. यावेळी सोबत वैष्णोदेवीचे दर्शन देखील नागरिकांना घेता येणार आहे. बाप्पांसाठी भव्य देखावा उलवे, सेक्टर 20, शगुन बिल्डिंग जवळ या ठिकाणी उभारण्यात आला आहे. उलवे नोड शेकाप अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी हे आयोजन केले आहे. संध्याकाळी बाप्पांचे स्वागत जल्लोषात करण्यात आले. यावेळी उलवे नगरी दुमदुमून गेली. उलवे नोडच्या राजाचे आगमन झाल्यानंतर बाप्पांची पहिली झलक कॅमेरात टिपण्यासाठी गणेश भक्तांनी गर्दी केली होती. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. उलवे नोडच्या राजाचे हे दहावे वर्ष असून नागरिकांनी बाप्पांच्या दर्शनाला यावे असे आवाहन शेकाप अध्यक्ष उलवे नोड, प्रशांत पाटील यांनी केले आहे.

# अंबाजोगाई येथे 1 हजार 150 खाटांचे रुग्णालय उभारावे

## स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे - उपमुख्यमंत्री अजित पवार


**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील**

मराठवाड्यातील ग्रामीण भागासाठी वैद्यकीय शिक्षण व आरोग्यसेवा अधिक सक्षम व्हावी, यासाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे १ हजार १५० खाटांचे सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वित्त विभागाच्या सचिव शैला ए, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
देशातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे रूपांतर आदर्श शासकीय संस्थेमध्ये करण्यात यावे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या महाविद्यालयासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. महाविद्यालयाच्या आधीच सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या कामांचा समावेश करून नवीन मास्टर प्लॅन तयार करावा. नवीन रुग्णालयात आधुनिक सुविधा, सुपर स्पेशालिटी सेवा यांचा समावेश असावा, उत्कृष्ट सुविधा असाव्यात. मराठवाड्यासाठी हे महाविद्यालय महत्वाचे असून येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. त्यामुळे येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा प्रस्ताव सादर करावा. हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, सध्या अस्तित्वातील इमारतींचा नियोजनपूर्वक वापर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.
वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, अंबाजोगाईतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यवाही वेगाने करावी. महाविद्यालयाचा आराखडा तयार करून, कार्यवाही करावी.
मराठवाडा विभागातील लोकसंख्येसाठी ही वैद्यकीय सुविधा म्हणजे एक मोठा दिलासा ठरणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन संधी मिळणार असून, ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ज्ञ सेवांचा लाभ मिळणार आहे.

## विंचूर येथे कै. सौ. विमल वासुदेव दुसाने यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त श्रीरामकथेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर प्रतिनिधी**

विंचूर येथील दुसाने परिवारातर्फे कै. सौ. विमल वासुदेव दुसाने यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त श्रीरामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे अमृत वक्ता व विद्वान ह.भ.प. मा. श्री. विवेकजी घळसासी (नागपूर) यांच्या रसाळ वाणीतील रामकथा हा कार्यक्रम होणार असून, यात भाविकांना अध्यात्मिक ज्ञान व संस्कारांचा लाभ मिळणार आहे.
हे रामकथा सोहळे मंगळवार दि. २६ ऑगस्ट ते रविवार दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी दररोज रात्री ८ ते १० वाजता आयोजित केले आहेत. तसेच सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९:३० ते १२:३० वाजता विशेष कार्यक्रम होईल. या दिवशी दुपारी १२:३० ते ३:०० वाजता महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.




कार्यक्रमाचे ठिकाण निसर्ग मंगल कार्यालय, निफाड रोड, विंचूर, ता. निफाड, जि. नाशिक येथे असून, दुसाने परिवाराने सहकुटुंब-सहपरिवार उपस्थित राहून श्रीरामकथेचे श्रवण करून अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.
ह.भ.प. विवेकजी घळसासी यांचा जन्म भूमिकुंड पंढरपूर येथे झाला असून, गेल्या ४३ वर्षांपासून व्यासपीठावरून अखंड सेवा देत आहेत. त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, मॉरिशस, दुबई आदी परदेशातही मराठी-हिंदी भाषेत व्याख्याने दिली आहेत. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

## लंबोदरा ..

विघ्नहरा सुख करा
वाजत गाजत यावे
सर्वधर्मियाचे चित्ती
निर्मित करे ओलावे

पर्यावरणपुरकमुर्ती
आकर्षण मनाभावे
जमे तशी सेवाकरी
परि खरी मनो भावे

संकटाशी लढावया
तू बळ आम्हां द्यावे
जनहितार्थ उपक्रम
सुकर्म तडीस न्यावे

यथाशक्तीपुजाअर्चा
बा गोडमानून घ्यावे
भक्त तुजला समान
कुणी ना उजवे डावे

मोदक देई भुकेल्या
मग प्रसाद मी खावे
अन्न दान पुण्य भले
उत्सवनिमीत्ते व्हावे

विसर्जन कुंडी मध्ये
नव बीज तिथे लावे
पुढीलवर्षी त्वरे यावे
गणेशा भाव बोलावे

**- हेमंत मुसरीफ पुणे.**

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## स्क्रीन अवॉर्ड्स 2025: यूट्यूबसोबत एका महत्वपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे डिजिटल-फर्स्ट पर्व

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



इंडियन एक्सप्रेस ग्रुपअभिमानाने यूट्यूबवरस्क्रीन अवॉर्ड्स 2025 चा नवा अविष्कार सादर करत आहे. स्क्रीन अवॉर्ड्स हा भारतीय सिनेमाच्या आणि कथाकथनाच्या सर्वात प्रतिष्ठित उत्सवांपैकी एक आहे.हा फक्त आणखी एक अवॉर्ड शो नाही.स्क्रीन अवॉर्ड्स 2025 हा संपादकीय विश्वासार्हता, सांस्कृतिक वारसा आणि डिजिटल पोहोच यांचा शक्तिशाली संगम आहे. इंडियन एक्सप्रेस ग्रुपच्या पत्रकारिता प्रथम (जर्नलिझम–फर्स्ट) तत्त्वज्ञानावर आधारित हे पुरस्कार प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेचे द्योतक आहेत. एक स्वतंत्र, ना–नफा तत्वावरील संस्था स्क्रीन अकादमीद्वारेविजेत्यांची निवड केली जाते. या अकादमीमध्ये ख्यातनाम चित्रपट निर्माते, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज सहभागी आहेत. त्यांचा उद्देश खऱ्या उत्कृष्टतेला ओळख देणे आहे. इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे कार्यकारी संचालक अनंत गोयंका म्हणाले:"जिथे केवळ कलेक्शनपेक्षा सर्जनशीलतेचा अधिक उत्सव साजरा केला जातो असे व्यासपीठ भारतीय सिनेमाला हवेच आहे. आपल्या कथाकारांकडे 1.4 अब्ज स्वप्न आहेत. ही स्वप्न आहेत परंपरेशी जोडलेली आणि रोमांचक भविष्याकडे धावणारी. हा अवॉर्ड, हे पुरस्कार त्या भावनेला सन्मान देईल आणि भारताच्या सर्वात धाडसी, मूळ प्रतिभेवर प्रकाश टाकेल. या उपक्रमासाठी यूट्यूब ही आमच्यासारखाच उत्साही आहे याचा आम्हाला आनंद आहे."
डिजिटल–फर्स्ट दृष्टीकोनातून आशय आणि फॉरमॅट–प्रकार हाताळतस्क्रीन अवॉर्ड्सयूट्यूबवर सादर होतील. त्यामुळे जगभरातील प्रेक्षकांना त्यांचा आनंद लुटता येईल. पहिल्यांदाच, बॉलीवूडमधील सर्वात मोठे स्टार्स यूट्यूबवरील प्रभावशाली क्रिएटर्ससोबत स्पॉटलाइट शेअर करतील. रेड कार्पेट, बिहाइंड–द–सीन्स कंटेंटपासून ते कथाकार, निर्माता, कलाकार प्रेरित स्टोरीटेलिंग आणि चाहत्यांच्या सहभागापर्यंतते या तीन महिन्यांच्या फेस्टिव्हलच्या प्रत्येक टप्प्यात सामील असतील. हा डिजिटल–फर्स्ट दृष्टीकोन प्रेक्षक मनोरंजनाचा अनुभव कसा घेतात यातील मूलभूत बदलाचे प्रतीक आहे. भारतातील इंटरनेट वापराचे वाढते प्रमाण,कनेक्टेड टीव्ही (CTV) चा झपाट्याने विस्तारआणि मोबाईल वापरामध्ये वाढ या महत्त्वपूर्ण प्रवाहांनी याला चालना दिली आहे. खरं तर, मागील 5 वर्षांपासून CTV हा भारतातील यूट्यूबचा सर्वात वेगाने वाढणारा स्क्रीन ठरला आहे. त्यातून प्रत्येक स्क्रीन आणि प्रत्येक फॉरमॅटवर प्रीमियम आशय उपलब्ध करून देण्याची प्लॅटफॉर्मची अनोखी क्षमता अधोरेखित होते. वेगवेगळ्या पिढ्या, प्लॅटफॉर्म्स आणि समुदायांना एकत्र जोडत हे सिनेमाची समृद्धी आणि डिजिटल स्टोरीटेलिंगचा प्रभाव यांचा संगम घडवते. स्क्रीन अवॉर्ड्स 2025भारताच्या सर्वात सक्रिय प्रेक्षकांशी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही प्रकारे जोडण्यासाठी सर्व ब्रँड्सनाअभूतपूर्व दृश्यमानता, सांस्कृतिक महत्त्व आणि मल्टी–फॉरमॅट स्टोरीटेलिंगची संधी देत आहे.

# कवितेला व्याकरण नाही तर अंत :करण असावे लागते.

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर.**
काव्ययोग काव्य संस्था लातूर जिल्हा आयोजित गणेशोत्सवानिमित्त *विघ्नहर्ता काव्योत्सव लातूर* coc-sit कॉलेज येथे दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडला.यावेळी स्वागताध्यक्ष डॉ.शंकर चामे तसेच कवी अजयकुमार वंगे,
कार्यक्रम अध्यक्ष डॉ.एम.आर.पाटील अध्यक्ष रॉयल एज्युकेशन सोसायटी लातूर , उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक मा. योगिराज माने अध्यक्ष म. सा. प.लातूर , कवी संमेलन अध्यक्ष अड.विजयकुमार कस्तुरे ज्येष्ठ साहित्यिक, विशेष उपस्थिती मा.सविता धर्माधिकारी अध्यक्षा आम्ही लेखिका लातूर, मा.दत्ता घारगे शारदा




इंटरनॅशनल स्कूल लातूर प्रमुख पाहुणे डॉ.बबन महामुने ज्येष्ठ कथाकर, मा. वर्षाराणी मुस्कावाड, युवा कवी मा.विजयकुमार पांचाळ आदि मान्यवर उपस्थित होते.
राज्यस्तरीय कविसंमेलमध्ये ५० कवींनी वेगळवेगळ्या जिल्ह्यातून सहभाग घेतला होता.तसेच काही निवडक लोकांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.प्रत्येक कवीला सन्मानचिन्ह , सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.
उद्घाटक मा. योगिराज माने सरांनी आपण कविता कशी लिहावी,कशी शब्दरचना असावी,का लिहावी,त्याचे वेगवेगळे पैलू सांगितले.त्यांच्या स्वरचित कवितेतून उदाहरणे सुद्धा दिली.त्यांचे मनोगत सर्व श्रोते तसेच कवी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते.शेवटी त्यांनी सांगितले की,कवितेला व्याकरण नाही तर अंतःकरण असावे लागते.ती कविता अंत कारणातून यावी लागते. असे सुंदर मनोगत पर भाषण दिले. तसेच कवी संमेलन अध्यक्ष अड विजयकुमार कस्तुरे यांनी आपल्या प्रसिद्ध गझलेतून तरुण पिढीला एका प्रेम विश्वात घेऊन गेले.तसेच विशेष उपस्थिती सविता धर्माधिकारी यांनी आपली वैज्ञानिक दृष्टीकोनातून रचना सादर केली.प्रमुख पाहुणे मा. वर्षाराणी मुस्कावाड यांनी आपल्या सावित्रीमाईचे गोडवे गायले.प्रमुख पाहुणे डॉ.बबन महामुने यांनी आपल्या एकपात्री कथेतून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध युवा कवी श्रीशैल सुतार तसेच काव्ययोग काव्य संस्था लातूर जिल्हा महिलाध्यक्षा श्रीमती अन्नपूर्णा गंगणे यांनी केले.या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन काव्ययोग काव्य संस्था अध्यक्ष मा.योगेश हरणे,उपाध्यक्ष मा.गौरव पुंडे, सचिव तुषार पालखे,महिलाध्यक्ष मा.पल्लवी पवार,छाया कांबळे, संगम उबाळे,प्रमोद सूर्यवंशी आदी सदस्यांनी नियोजन केले.
तसेच आभार प्रदर्शन मा.अस्मिता तिगोटे यांनी केले.

## गणपती उत्सवानिमित्त विंचूर शहरातून पोलिसांचा रूट मार्च

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर प्रतिनिधी**
**विंचूर** : गणपती उत्सव शांततेत आणि सुव्यवस्थेत पार पडावा, तसेच शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून मंगळवारी दणदणीत रूट मार्च काढण्यात आला.



हा रूट मार्च विंचूर पोलीस स्टेशनपासून सुरू झाला. त्यानंतर कॉलेज रोड, मारवाडी पेठ, नेहरू चौक, बजरंग मंडळ, सिद्धार्थ नगर, बाजार गल्ली आदी प्रमुख मार्गावरुन मार्गक्रमण करत पुन्हा पोलीस स्टेशन येथे समारोप झाला. या वेळी रॅपिड अक्शन फोर्ससह दंगा नियंत्रण पथकाची प्रभावी तुकडी, पोलिसांचा ताफा व पोलीस वाहनांनी शहरात शिस्तबद्ध संचलन केले.
रूट मार्चदरम्यान नागरिकांनी पोलीस ताफ्याचे स्वागत करत उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. रूट मार्चमुळे शहरात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहणार असल्याचा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.
हा रूट मार्च लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. त्यावेळी उपनिरीक्षक किरण साळुंके, उपनिरीक्षक मोहन पाटील, हवालदार सागर आरोटे, अविनाश सांगळे यांच्यासह मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी उपस्थित होते.
पोलीस प्रशासनाकडून गणेशोत्सव काळात सतर्कता व काटेकोर सुरक्षा व्यवस्था ठेवली जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता व उत्कृष्ट गायक श्री सिद्धार्थ धंधरे यांना समाजक्रांती राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित ज्योत्सना करवाडे

**प्रतिनिधी दैनिक युवक आधार**
दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी विदर्भातील अमरावती येथे समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न झाला. बीएसएफ बहुउद्देशीय संस्था अमरावती ,उपेक्षित नायक न्यूज व संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा यांच्या तिहेरी संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय समाज क्रांती पुरस्कार सोहळा संपन्न झाला. सदरच्या कार्यक्रमांमध्ये पत्रकार सामाजिक कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते उत्कृष्ट गायक उत्कृष्ट निर्माता निर्देशक दिग्दर्शक अभिनेता अभिनेत्री यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला
असेच आमचे त्रिगुणसंपन्न सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व उत्कृष्ट गायक श्री सिद्धार्थ धंधरे ( बुलढाणा चिखली ) यांना राज्यस्तरीय समाजक्रांती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील अनेक नामवंत सिनेतारक ,रील तारक ,निर्माते ,दिग्दर्शक, अभिनेता ,अभिनेत्री ,पत्रकार वर्ग , सामाजिक




कार्यकर्ते व गायक इत्यादी उपस्थित होते.
संस्थापक अध्यक्ष भूषण सरदार यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री सिद्धार्थ धंदरे यांच्या या सन्मानाचे त्यांचे आप्तस्वकीय मित्रमंडळी समाज बांधव व विविध क्षेत्रांमधून सर्वत्र कौतुक होत आहे व त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षावही होत आहे

## गणेशोत्सवात डीजेला कडक बंदी पारंपरिक वाद्यांचाच वापर करावा.! - पोलीस निरीक्षक संजय चौधरी.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**
**मालेगाव** : – आगामी गणेशोत्सवात शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी डीजे वापरण्यास सक्त मनाई असून फक्त पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. अशा सूचना मालेगाव पोलीस स्टेशनचे निरीक्षक संजय चौधरी यांनी दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी या नियमांचे पालन अनिवार्य आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, गणेशोत्सव




काळात मद्यप्राशन करून धिंगाणा घालणे, तसेच कोणताही वादविवाद प्रकार सहन केला जाणार नाही. असे प्रकार आढळल्यास पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येईल. गणेशोत्सव काळात सर्व मंडळांनी खालील बाबींचे काटेकोर पालन करावे. अशा सूचना ठाणेदार चौधरी यांनी दिल्या आहेत.
ध्वनिप्रदूषण होणार नाही याची प्रत्येक मंडळाने काळजी घ्यावी, गुलालाचा वापर फक्त पूजा विधीसाठी मर्यादित स्वरूपात करावा. गणपती उत्सवासाठी रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. वर्गणी जमा करताना कोणावरही जबरदस्ती करू नये, वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी मूर्ती स्थापना करू नये, मंडळांनी विजेचे अधिकृत कनेक्शन घ्यावे, रात्रीच्या वेळी मंडपावर लक्ष ठेवण्यासाठी सदस्यांची नेमणूक करावी, मिरवणुकीत आक्षेपार्ह गाणी वाजवू नयेत तसेच, डीजेवर संपूर्ण बंदी असून, जर कुठे डीजे गाणी किंवा प्रचंड आवाज ऐकू आला. तर कोणालाही वाचवले जाणार नाही. थेट दंडात्मक तसेच ध्वनी प्रदुषण नियंत्रण कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. असा स्पष्ट इशारा पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी दिला आहे. या सूचना काटेकोरपणे पाळून प्रशासनाला सहकार्य करावे गणेशोत्सव शांतता, सौहार्द आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करावा. असे आवाहन ठाणेदार संजय चौधरी यांनी केले आहे.

## तातूभाऊ देशमुख अंबादास धुळे यांच्या धनज-मोहदरी शेतकऱ्यांना बांधावर जाऊन भेटी

**दैनिक युवक आधार उमरखेड**
**तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**
पाऊस हा शेतीसाठी जीवनदायी असला तरी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस किंवा कमी पाऊस यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते त्यानुसारच धनज मोहदरी शिवरात 16 ऑगस्ट पासून पाण्याने थैमान घातले होते अशी अतिवृष्टी मागील बऱ्याच वर्षांपासून झाली नव्हती यामुळे शेतातील पिके पाण्यात बुडाली पिकांचे अतोनात नुकसान झाले पिकांच्या मुळांवर पाणी साचल्यामुळे संपूर्ण पिके कुजून गेली मातीतील सुपीकता कमी होते अतिशय कमी झाली अशा अवकाळी पावसामुळे नुकसान झाले यावर्षी शेतकऱ्याच्या उत्पादनात मोठी घट होणार आहे इतर नुकसान म्हणजे मातीचे धूप होऊन शेताची सुपीकता नष्ट





होते होणार आहे अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांचे कर्ज वाढत जाईल शेतकरी आर्थिक व मानसिक त्रासात सापडेल अशातच कॉंग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तातूभाऊ देशमुख आणि अंबादास धुळे यांनी धनज मोहदरी येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली शेतकऱ्यांना त्यांनी दिलासा देऊन नक्कीच लवकर शासनाकडून मदत मिळून दिली जाईल असे शेतकऱ्यांना आश्वासन दिले त्यांच्या या भेटीमुळे धनज मोहदरी येथील शेतकऱ्यांना वाटल कि तालुक्यात आमच्या ही समस्या जाणून घेणार कोणी तरी आहे म्हणून यावेळी शेतकरी दत्तप्रसाद जाधव, प्रकाश डोंगरे,तातेराव भडगे, प्रकाश आमले, संभाजी भडगे,हरिभाऊ बोंबले, दत्ता कांबळे, काशिनाथ डाखोरे, सखाराम खोकले, ऋषिकेश डाखोरे,बळीराम डाखोरे, सह गावकरी शेतकरी उपस्थित होते...

## पंचायत समिती सिल्लोड येथे महिलांनी उत्पादन केलेल्या श्री गणेश मूर्ती विक्री केंद्राचे उद्घाटन.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत सिल्लोड तालुक्यातील स्वयंसहायता महिला समूह यांनी तयार केलेल्या गणेश मूर्ती विक्री केंद्राचे आज सिल्लोड पंचायत समिती परिसर येथे मा. श्री रत्नाकर पगार साहेब गटविकास अधिकारी वर्ग- १ सिल्लोड सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती श्री विश्वासराव दाभाडे यांच्या शुभहस्ते उत्साहात उद्घाटन करण्यात आले.
तालुक्यातील कानिफनाथ महिला शिंदेफळ,जय भवानी महिला स्वयंसहायता समूह वांगी या समूहाचे तालुका स्तरावरील विक्री केंद्र सुरू





करण्यात आले, तसेच सिल्लोड तालुक्यात एकूण 12 गणेश मूर्ती विक्री केंद्रांची सुरुवात करण्यात आली.
तालुक्यातील बाजारपेठ असलेल्या मोठ्या गावामध्ये इतर ठिकाणी पण बचत गटाचे स्टॉल आहेत त्या ठिकाणी पण खरेदी करावी. गरिबातील गरीब महिलांचे उत्पादन केलेल्या मूर्तीची खरेदी करून त्याचा उत्साह वाढवावा. असे आवाहन . मां. रत्नाकर पगार साहेब गटविकास अधिकारी वर्ग-१ केले.
मा. गटविकास अधिकारी श्री रत्नाकर पगार यांनी सर्व कर्मचारी महिला बचत गटामार्फत असलेल्या स्टॉल मधूनच खरेदी करावी.. सर्व कर्मचारी यांनी त्याच्या विभागामध्ये प्रचार प्रसिद्धी करावी.आणि खरेदी करून आपली स्वतःची सेल्फी ग्रुप वर सेंड करावी .
तालुक्यामध्ये एकूण 48 समूहांनी 44138 एवढ्या गणेश मूर्ती तयार केलेल्या आहेत तरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी सर्व सिल्लोड तालुका वासियांनी महिला स्वयंसहायता समूहांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करावे व तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी सुद्धा समूहांकडूनच बाप्पाची मूर्ती खरेदी करावी सर्व असे नम्र आवाहन तालुका अभियान व्यवस्थापक श्री संदीप कापसे यांनी केले.
यावेळी उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष,NRLM सिल्लोड सर्व टीम तसेच पंचायत समिती अंतर्गत सर्व अधिकारी कर्मचारी आणि तालुक्यातील महिला उद्घाटन सोहळ्यास उपस्थित होत्या.

## तेजस डाकी सामाजिक विकास मंडळाच्या भव्य मखर सजावट स्पर्धा ..

### उरण मतदार संघ मर्यादित ; आकर्षक बक्षिसे मिळवा

**दैनिक युवक आधार**
**उरण वार्ताहर** – उरण मतदार संघात सामाजिक कार्यात अग्रेसर असणारी संस्था तेजस डाकी सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे भव्य मखर सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली .यात सहभागी होण्यासाठी आपल्या कडे बनवित असलेली मकर हि धर्माकोल ची नसावी . पर्यावरण संदेश देण्यासाठी हि महत्त्व पूर्ण अट ठेवण्यात आली आहे. मकर मागच्या वर्षाचीच बनवलेली, एक सारखी कोणा दुसऱ्या सारखी प्रतिकृती नसावी ,ती सुरुवाती पासून बनवत असताना सजावट करे पर्यंतचे चित्रीकरण रेकॉर्ड करून Instagram – https://www.instagram.com/tejas_daki_fansclub च्या चॅनेल वर आपल्या संपूर्ण माहिती सही आकर्षक पध्दतीने पोस्ट करावे .



*प्रथम पारितोषिक* – ₹ २५,०००/– + सन्मान चिन्ह
*द्वितीय पारितोषिक* – ₹ १५,०००/– + सन्मान चिन्ह
*तृतीय पारितोषिक* – ₹ १०,०००/– + सन्मान चिन्ह
प्रत्येक भाग घेणाऱ्या स्पर्धकाला सन्मानित केले जाणार असल्याचे दानशूर समाजसेवक तेजस डाकी सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष तेजस डाकी यांनी सांगत यात सहभाग घेणारा कलाकार ,सदस्य, कुटुंब हा उरण मतदार संघतीलच असावा हे Alle सांगण्यात आले आहे .हे पारितोषिक दि.30 ऑगस्ट रोजी घोषित केले जातील असे सांगण्यात आले. या बद्दल अधिक माहितीसाठी
*संपर्क* – 8652515656 / 8291658631 / 8108808082
व खालील सूचना नाव नोंदणीसाठी अंतिम तारिख – २९/०८/२०२५ असल्याने लवकरात लवकर या आपल्या तेजस डाकी मित्र परिवारा कडून पारितोषिक व बक्षिसे मिळवा.

# पुसद येथे विदर्भस्तरीय आदिवासी युवा महोत्सव उत्सवात साजरा.

## आदिवासी विध्यार्थ्यांचा शिक्षणिक दर्जा उचवण्यासाठी प्रयत्न करू - मा. आ. उत्तमराव इंगळे.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी / राजु गायकवाड**

१९९४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी साठी आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून घोषित केला. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे जगातील आदिवासी समाजाचे जीवनमान सुधारणे आणि त्यांच्या समस्या, गरजा आणि हक्क याकडे लक्ष वेधणे आहे जगभरातील आदिवासी लोकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनातील योगदानाला मान्यता देणे व जागरूकता निर्माण करणे हा उद्देश आहे जागतिक आदिवासी गौरव दिनाचे औचित्य साधून पुसद येथे विदर्भस्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन मोठ्या थाटात आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम तीन टप्प्यात पार पडला सुरवातीला मान्यवर चा सत्कार सोहळा सपन्न झाला यावेळी अध्यक्ष म्हणुन माजी आमदार निलय नाईक, तर उदघाटक माजी आमदार उत्तमराव इंगळे, उपस्थित होते. विशेष उपस्थिती मध्ये नाईक फाउंडेशन च्या अध्यक्षा सौ. मोहिनी नाईक माजी आमदार डॉ. संतोष टारफे, अमरावती आदिवासी विकास उपायुक्त शिवानंद पेढेकर , माजी समाजकल्याण आयुक्त माधवराव वैद्य , उपविभागीय अधिकारी अशिष बिजवाल , आदिवासी विकास विभाग पुसद चे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर , प्रतिक दुम्हारे , गजानन उघडे , केशव मस्के , डॉ नामदेव सरकुंडे , नारायण कऱ्हाळे , किरण मिरासे , गजानन फोपसे , किसन भुरके , सुखदेव फोपसे , शामराव व्यवहारे , दत्ता दुम्हारे , किसन काळे , यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड सुनील ढाले यांनी केले त्यांनी आदिवासी च्या विविध समस्या मांडल्या त्यामध्ये प्रामुख्याने 12500 पदभरती संदर्भात



त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या , जिल्हा आणी विभागीय स्तरावर वसतिगृहातील डी बि टी योजना बंद करावी , आश्रमशाळेमधील नवीन इमारत उभारणे , प्रशिक्षणाच्या योजना नामांकित संस्थेलाच मिळणे , आश्रम शाळेमध्ये बाह्यस्त्रोत कर्मचारी तात्काळ भरण्यात यावे .पैसा कायद्याचे पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे , आदिवासी विकास विभागाच्या 85000 रिक्त जागा भराव्यात , नीट - mscit , टायपिंग , स्पर्धा परीक्षा शिकवणी वर्ग हे नामांकित संस्थेला देण्यात यावे , नामांकित इंग्रजी माध्यम शाळेचा दर्जा वाढवावा , ठक्कर बाप्पा योजना मोठ्या प्रमाणात सुरु करावी , आश्रमशाळेतील इमारती सुरु नवीन बाधव्यात , अशा अनेक अडचणी ना वाचा फोडली त्यानंतर मोहिनीताई नाईक यांनी आदिवासी समाजाच्या पाठीशी नाईक घराणे आहे असे ठामपणे सांगितले आदिवासी च्या विकासासाठी आदिवासी मंत्री ना. इंद्रनिल नाईक साहेब कटीबद्ध आहेत त्यांनी पुसद मध्ये आदिवासी समाजासाठी विशेष उल्लेखनीय काम केल्याचे असं त्या म्हणाल्या त्यात प्रकल्प कार्यालयाची निर्मिती , त्यासाठी शहराच्या मध्यभागी जागा आणी तेथेच तब्बल 31 कोटी बांधकामासाठी भरीव निधीची उपलब्ध करून दिला , हर्षी , वडगाव शिंदे 46 कोटी बांधकामासाठी , आदिवासी बजेटमध्ये 250 कोटी हून अधिक निधी दिला . कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड निलय नाईक यांनी लवकरच राज्याच्या मुख्यमंत्री यांची भेट आदिवासी शिष्टमंडळाची भेट घालून देऊ असे सांगितले आदिवासी समाज खुप प्रामाणीक आहे तो नकीच यशाच्या शिखरावर चढल्याशिवाय राहणार नाही , शेवटचा टप्पा म्हणजे सास्कृतिक कार्यक्रम यामध्ये आदिवासी प्रकल्पात येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा वसतिगृह आणी विदर्भातील नामांकित नृत्य मोठ्या उत्साहात सादरीकरण विविध आदिवासी सांस्कृतिक संगीतावर नृत्य सादर केले विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये शासकीय इंग्रजी माध्यम आश्रम शाळा गोविंदनगर यांनी प्रथम क्रमांक पटकवला तर दुसर क्रमांक आदिवासी मुलीचे शासकीय वसतिगृह उमरखेड यांनी मिळवला आणि तिसरा क्रमांक महात्मा मुंगसाजी आदिवासी आश्रम शाळा, मरसूळ यांनी मिळवला सोबतच या कार्यक्रमात प्रा. सुरेश धनवे यांचे आदिवासी समाजातील जुनी विवाह पद्धत असलेली प्रथा - मव्हतूर या पुस्तकाचे मान्यवरांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले सदर कार्यक्रमाला स्वयंसेवक म्हणून अंबिशन अकॅडमि चे विध्यार्थी यांनी चांगले सहकार्य केले त्याबद्दल आयोजकांनी त्यांचे आभार व्यक्त केले सोबतच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेश धनवे, यांनी तर सांस्कृतिक चे राजु गायकवाड यांनी केले आणि आभार गजानन टारफे यांनी मानले सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रामदास भडंगे , संतोष गारुळे, बबलू मळघने, बालाजी उघडे, तातेराव भडंगे, गणेश भुजाडे, समाधान बळी, संदेश पांडे , रंगराव डाखोरे , दिनेश खेकाळे , काशिनाथा डाखोरे , सुरेश बोके , नितीन तायवाडे , अतुल पवार , अनिल गावंडे , उमेश राठोड , भागवत गिडे , उमेश उद्राक्षवार , शैलेश कोटुरवार , रवी घड्याळे , अनिल इंगळे , शंकर इंगळे , अनिल ढाले , राजू इंगळे , कुबेर मस्के , निखिल तोरकड , अतिश मोहेकर , भगवान गायकवाड , शिवाजी तोरकड , लक्ष्मण पांडे , पवन पोटफाडे , अमोल दुम्हारे , रवी वाळके , यांनी अथक परिश्रम घेतले..

---

# वशेणी इतिहास मंडळाचा सातवा वर्धापन दिन उत्साहात संपन्न.

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

जनसेवेतून आनंद देणाऱ्या उरण तालुक्यातील वशेणी गावात कार्यरत असणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा सातवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला या दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी साहित्यिक श्री मोरेश्वर बागडे यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी भागुबाई विद्यालयाच्या प्राचार्या अनुराधा काठे मॅडम, उरण पंचायत समितीच्या माजी सभापती समिधा म्हात्रे ,नवीन सेवे केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. शंकर म्हात्रे ,सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री सदाशिव पाटील ,माजी सरपंच प्रसाद पाटील, ग्रामपंचायत सदस्या प्रीती पाटील ,साई सेवक जगन्नाथ पाटील ,श्री रमेश पाटील ,महेंद्र गावंड, देविदास पाटील, पुरण पाटील, बासरी वादक प्र.ना. बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

छोट्या छोट्या उपक्रमातून जनसेवेचे मूल्य जपणारे वशेणी इतिहास संपादकीय मंडळ म्हणजे देशाची सेवा करणारे मंडळ आहे.

असे गौरव उद्गार यावेळेस साहित्यिक व इतिहास अभ्यासक मोरेश्वर बागडे यांनी व्यक्त केले.

या वर्धापन दिनानिमित्त वशेणी व उरण तालुक्यातील आपापल्या परीने विविध क्षेत्रात जनसेवा करणाऱ्या दहा व्यक्तींना मंडळाकडून जनसेवा पुरस्कार प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

१)सौ. जान्हवी जितेश कडू रा.जि.प शाळा रानसई वाडी (शैक्षणिक सेवा पुरस्कार)
२) श्री नागनाथ कुठार वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोरा पोलीस स्टेशन (पर्यावरण सेवा पुरस्कार)
३) श्री नागेश पोशा पाटील पुनाडे (सामाजिक सेवा पुरस्कार)
४) श्री संदीप रामदास पाटील बोकड विडा (संघटन सेवा पुरस्कार)
५) श्री शशिकांत सहदेव ठाकूर वशेणी (समालोचन सेवा पुरस्कार)
६) कुमारी आम्रपाली कमलाकर पाटील वशेणी (दांडपट्टा कला संस्कृती जतन पुरस्कार)
७) श्री बळीराम चांगदेव म्हात्रे वशेणी (सामाजिक सेवा पुरस्कार)
८) श्री टिळक नामदेव पाटील वशेणी (लग्न देवकार्य सेवा पुरस्कार)
९) श्रीमती लिलाबाई जरासंध म्हात्रे वशेणी (लग्नकार्य धवलारीन सेवा पुरस्कार)
१०) श्री भरत लक्ष्मण पाटील वशेणी (नाट्यप्रबोधन सेवा पुरस्कार)

आज समाजाची विचारधारा बदलत आहे, तरुणांची जीवनमूल्य देखील बदलत आहेत . असा बदलता समाज दिशाहीन होऊ नये म्हणून जनसेवा करणाऱ्या लोकांचे कार्य दीपस्तंभा सारखे पुढे यायला हवे, याच हेतूने वशेणी इतिहास संपादकीय मंडळ जनसेवा



पुरस्काराचे आयोजन करते .असे मत यावेळी मंडळाचे कार्यवाहक श्री मच्छिंद्र म्हात्रे यांनी मांडले.

दिवसागणिक अनेक नवनवीन सामाजिक मंडळे, सांस्कृतिक मंडळे जन्माला येतात आणि एक-दोन वर्षात समाप्त सुद्धा होतात.परंतु स्थापनेपासून ते आज तगायत सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबवून
कोणत्याही फळाची अपेक्षा न करता सातत्याने समाज उपयोगी उपक्रम राबवणारे वशेणी इतिहास संपादकीय मंडळ कौतुकास पात्र आहे असे गौरव उद्गार उरण तालुक्याच्या माजी सभापती सौ समिधा निलेश म्हात्रे यांनी व्यक्त केले.

या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण सुद्धा करण्यात आले, त्याचप्रमाणे शाळेतील मुलांना स्कूल बॅग वाटप, मरू आई व बापदेव मंदिरांना डस्टबीन वाटप देखील करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मनोज गावंड आणि श्री .बी.जे. म्हात्रे यांनी केले.

सदर कार्यक्रमास श्री संदेश गावंड,सतीश पाटील ,पुरुषोत्तम पाटील ,विश्वास पाटील, संजय पाटील, हरेश्वर पाटील, कैलास पाटील, हरिश्चंद्र ठाकूर, गणेश खोत,
अनंत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , न्यू पनवेल (स्वायत्त) येथे वाणिज्य मंडळाचे उद्घाटन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाचे दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी पिल्लई महाविद्यालय, रसायनीच्या प्राचार्या मा. प्रा. (डॉ.) रिंकू शंतनू यांची प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लाभली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक प्रो.(डॉ.) बी.डी.आघव हे देखील उपस्थित होते. वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो.(डॉ.) एस.बी. यादव, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो.(डॉ.) अजय दीक्षित, लेखा व वित्त विभाग प्रमुख डॉ. निलेश कोळी, व्यवस्थापन विभाग प्रमुख प्रा. कुशलकुमार कुराणी आणि वाणिज्य मंडळाचे प्रमुख प्रा. ओमप्रकाश कुमावत, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

उदघाटन कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सदर केलेल्या पाहुण्यांच्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर वाणिज्य मंडळाचे अध्यक्ष प्रा. ओमप्रकाश कुमावत यांनी वाणिज्य विभागाची ओळख करून दिली व भविष्यातील होणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. त्यादरम्यान हेरॉल्ड अंकाचे अनावरण झाले. या कार्यक्रमाप्रसंगी पिल्लई महाविद्यालय, रसायनीच्या प्राचार्या मा. प्रा. (डॉ.) रिंकू शंतनू यांनी त्यांच्या संबोधनात वाणिज्य क्षेत्र हे व्यापारचे हृदय आहे असे प्रतिपादन केले, तसेच वस्तू विनिमय, आधुनिक जगातील वाणिज्य क्षेत्रातील होणारे बदल, भारताची ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडील वाटचाल यावर प्रकाश टाकला. तसेच, त्यांनी जुन्या काळातील आणि आधुनिक काळातील व्यवहाराच्या बदलत्या कलांचा आढावा घेतला. वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो.(डॉ.) एस.बी.यादव यांनी त्यांच्या संबोधनात महाविद्यालाची ओळख करून दिली व त्यांनी त्यांच्या भाषणात जीवनाशी संबंधीत वास्तविक उदाहरण देऊन उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दरम्यान, दर वर्षीप्रमाणे या वर्षी हि पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि मोडेल मेकिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ज्योती फडतरे या विद्यार्थिनीने केले. तसेच कु. प्रियांका दुबे या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले.

प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब, संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा. श्री. वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार मा. श्री. प्रशांत ठाकुर, संस्थेचे सचिव मा.डॉ. एस.टी. गडदे व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी आयोजकांचे कौतुक केले.

---

# मुरुड जुगाराच्या विळख्यात; – कुटुंब उद्ध्वस्त, संस्कृतीला तडा

**दैनिक युवक आधार**
**लातूर/मोहम्मद पिंजारी**



मुरुड शहर आज जुगाराच्या विळख्यात इतके घट्ट अडकले आहे की, या भूमीच्या संस्कृतीवर काळा डाग उमटला आहे. (दक्षिण-उत्तर) बीट, पारू नगर, मुख्य रस्ता, दत्तनगर, बाह्य वळण रस्ता इ. परिसर आणि विशेषतः शहराच्या बाह्य रस्त्याच्या बाजूला रात्री उघड्यावर लावलेली टेबलं आणि अवैध धंद्यांची रेलचेल पाहून नागरिकांच्या मनात संताप आणि वेदना उमटते

आपुलकी, एकोपा आणि प्रामाणिक कष्ट यासाठी ओळखले जाणारे मुरुड आज जुगाराच्या नशेत हरवले जात आहे. पैशांच्या गोंगाटात, पैजांच्या आरोळ्यांत आणि व्यसनाच्या अंधारात या शहराची खरी ओळख आणि संस्कृती लुप्त होत आहे

जुगाराच्या या विळख्यात अडकलेल्या कुटुंबांचा आक्रोश असह्य आहे. कष्टाने कमावलेला पैसा घर चालवण्याऐवजी जुगाराच्या टेबलांवर उधळला जातो. शिक्षणाची स्वप्नं पाहणारी मुलं शाळा-महाविद्यालयांऐवजी जुगाराच्या अड्ड्यांवर दिसतात, तेव्हा पालकांचे हृदय पिळवटून जाते. वह्या-पुस्तकं, शैक्षणिक शुल्क आणि स्पर्धा परीक्षांची तयारी यांचे महत्त्व हरवले आहे. रात्री जुगारात रमणारी तरुणाई स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य अंधारात ढकलत आहे, आणि गावाची संस्कृती डगमगत आहे.

रात्रीच्या गल्ल्यांतून पैजांचे हल्ले, शिव्याशापांचा मारा आणि भांडणांचा गोंगाट ऐकू येतो. दारूच्या बाटल्या, नशेची झिंग आणि पैशांवरून होणारे वाद परिसराला भयाण बनवतात. जुगाराच्या अड्ड्यांतून केवळ पैशांचाच नाही, तर माणुसकीचा आणि संस्कृतीचा नाश होत आहे. एकेकाळी अभिमानाने सांगितले जाणारे मुरुडचे एकोप्याचे, सुसंस्कृत परंपरांचे गाव आता जुगाराच्या मोहात हरवले आहे. या दुष्परिणामांची झळ संपूर्ण समाजाला बसत आहे. शिक्षण थांबते, रोजगाराच्या संधी हिरावल्या जातात, घराघरात अस्वस्थता पसरते, आणि स्त्रियांना असुरक्षिततेची भावना जाणवते. मुलं रडगाणी गात वाढतात, नात्यांची शुचिता तुटते, आणि शेजारधर्माला तडा जातो. एकोप्याच्या जागी संशय आणि भीती घर करते. शहराचे सौंदर्य, संस्कृतीचे वैभव आणि परंपरांचे गौरव जुगाराने गिळले आहे.

आज मुरुडकरांच्या मनात एकच प्रश्न आहे – "आपली संस्कृती, गावाचे सौंदर्य आणि पुढच्या पिढ्यांचा वारसा आपण स्वतःच्या हाताने का उद्ध्वस्त करू?" शहराचे नाव टिकवायचे असेल, संस्कृतीचा दिवा तेवता ठेवायचा असेल आणि पुढच्या पिढ्यांना स्वच्छ वारसा द्यायचा असेल, तर समाजाने एकजुटीने उभे राहणे गरजेचे आहे.

वेळ अजून निघून गेलेली नाही, पण ती निघून जाण्याच्या मार्गावर आहे. या जुगाराच्या विळख्याला रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलणे अपेक्षित आहे.

---

# जाहीरनामा

तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी, वाशिम यांचे कार्यालय सिव्हील लाईन वाशिम ता. जि.वाशिम-४४४५०५

**क्रं. कलि /प्रस्तु-१/कावी - /592/२०२५**
**दिनांक-२५.०८.२०२५**
**रा.मा.क्रं./टी.एम.सी-१०० (२)/ शिरपुटी /592/२०२५-२६**
**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार संतोष रोहू जाधव रा. शिरपुटी ता. जि. वाशिम यांनी मौजे शिरयूटी येचिल गट नं.९ मधिल क्षेत्र ०.८२ हे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील साधे कुळ या रकान्यात हरसिंग बाबू ५१-५२ हि कुळाची नोंद कमी करण्यात यावी असा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

तरी सदर प्रकरणात मौजे शिरपुटी येथिल गट नं.९ मधिल ०.८२ हे आर हे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील साधे कुळ या रकान्यात हरसिंग बाबू ५१-५२ हि कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत प्रकरणात कोणांचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**दिनांक- २५.०८.२०२५ (निलेश पळसकर)**
**ठिकाण-वाशिम**
**तहसिलदार, वाशिम**
**प्रतिलिपी,**

६. ग्राम महसूल अधिकारी, मौजे शिरपुटी ता. जि. वाशिम यांना माहिती करिता सदरहू जाहीरनामा यांना माहिती करिता अग्रेषित. सदरहू जाहीरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करून त्या बाबतचा प्रसिद्ध अहवाल उलट टपाली या कार्यालयात सादर करावा.
२. तहसिल जमादार तहसिल कार्यालय वाशिम यानी सदरहू जाहीरनामा कार्यालयाचे नोटीस बोर्डावर
लावून त्याबाबतचा प्रसिद्धी अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३. अर्जदार अर्जदार संतोष रोडू जाधव रा. शिरपुटी ता.जि. वाशिम यांना माहिती करिता. आपण सदर जाहीरनामा स्थानिक वर्तमान पत्रा मध्ये प्रसिद्ध करून त्या वर्तमानपत्राची एक प्रत या कार्यालयात सादर करावी.

**तहसिलदार, वाशिम**

---

# मंत्रालय बॅकेकडून विलास उंबरकर यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**



राजापूर तालुक्यातील मौजे कोदवली गावचे सुपुत्र श्री विलास उंबरकर हे मंत्रालयातून भाषा अधिकारी हिंदी या पदावरून सेवानिवृत्त झाल्याबद्दल मंत्रालय बॅकेच्या वतीने नुकताच त्यांचा मंत्रालयात सत्कार करण्यात आला

श्री उंबरकर यांची १९९६ मध्ये अनुवादक म्हणून नियुक्ती झाली अनुवादक म्हणजे इंग्रजीतून हिंदी भाषेत भाषांतर करणे महाराष्ट्र शासनाचे कायदे, मा. राज्यपाल, मुख्यमंत्री व अन्य मंत्री महोदयांची भाषणे अनुवादित करणे हे त्यांच्या कामाचे स्वरूप होते त्यानंतर पर्यवेक्षक अणि आता २०२४ साली भाषा अधिकारी पदावरुन मंत्रालयातून सेवानिवृत्त झाले त्यांनी गेली २७ वर्षे इमानइतबारे आपली सेवा बजावली आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शेकाप कामोठे विभाग अध्यक्षपदी अमोल शितोळे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शेकापच्या कामोठे विभाग अध्यक्षपदी अमोल शितोळे यांची नुकतीच नियुक्ती पक्षाचे नेते मा.आ.बाळाराम पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून करण्यात आली.



अमोल शितोळे यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक व राजकीय कामाची दखल वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली व त्यांना कामोठे विभाग अध्यक्षपदाच्या नियुक्तीचे पत्र कार्यालयीन चिटणीस देवेंद्र मढवी व चिटणीस प्रकाश म्हात्रे यांच्या माध्यमातून शेकाप नेते मा.आ.बाळाराम पाटील व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आले. यावेळी बोलताना शेकाप वाढविण्यासाठी पूर्णतः प्रयत्न करणार असून तळागळातील लोकांना पक्षाच्या माध्यमातून न्याय मिळवून देवू, असे मत नवनिर्वाचित कामोठे विभाग अध्यक्ष अमोल शितोळे यांनी व्यक्त केले आहे.

# आज छत्रपति कारखान्यामार्फत शेतकरी मेळाव्याचे आयोजन

## शेतकरी सभासदांनी लाभ घ्यावा जाचक बापू यांची साद

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपति सहकारी साखर कारखान्याने "ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता (ऐ.आय.) तंत्रज्ञानाचा वापर" या विषयावर दिनांक २७/०८/२००२५ रोजी कारखान्याचे श्री छत्रपति मंगल कार्यालयात परिसंवाद आयोजित केला आहे. या परिसंवादासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री,मा.ना.श्री.अजितदादा पवार,कृषिमंत्री, मा.ना.श्री.दत्तात्रय मामा भरणे, बारामती कृषि विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष,मा.श्री. राजेंद्र दादा पवार हे उपस्थित राहणार आहेत.तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट,मांजरी बुद्रुक,महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.मुंबई,कृषि विज्ञान केंद्र,माळेगांव व मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र,पाडेगांव या संस्थेतील ऊस विशेषतज्ञ उपस्थित राहून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत,अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष श्री. पृथ्वीराज बापू जाचक यांनी दिली.

ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता (ऐ.आय.)या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ऊस उत्पादनात अंदाजे ३० ते ४० टक्के वाढ प्रत्ययास येवून खताची व पाण्याची बचत मोठ्या प्रमाणात होत आहे व हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी उपयुक्त व फायदेशीर असलेने कारखान्याने ऊस शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता (ऐ.आय.) या तंत्रज्ञानाचा वापर करणेबाबतची योजना राबविली आहे.या तंत्रज्ञानाची सखोल माहिती ऊस उत्पादक शेतकऱ्यांना व्हावी,यासाठी परिसंवादाचे आयोजन करणेत आले आहे.या परिसंवादास ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आव्हान कारखान्याचे अध्यक्ष श्री.पृथ्वीराज बापू जाचक व यांनी केले आहे.यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास गावडे संचालक ॲड. श्री.शरद जामदार,श्री. रामचंद्र निंबाळकर श्री.शिवाजीराव निंबाळकर श्री.पृथ्वीराज घोलप श्री.गणपतराव कदम श्री.प्रशांत दराडे,श्री.अजित नरुटे श्री.विठ्ठलराव शिंगाडे, श्री.अनिल काटे श्री.बाळासाहेब कोळेकर, श्री.संतोष मासाळ श्री.निलेश टिळेकर श्री.सतिश देवकाते, श्री.अशोक पाटील श्री.मंथन कांबळे डॉ.श्री.योगेश पाटील श्री.तानाजी शिंदे सौ.सुचिता सपकळ सौ.माधुरी राजपुरे, कार्यकारी संचालक श्री अशोक जाधव फायनान्स मॅनेजर श्री.हनुमंत करवर व मुख्य शेतकी अधिकारी श्री. जालिंदर शिंदे हे उपस्थित होते.

# देगलूर ते हणेगाव रस्ता बनला जिवघेणा,अमृतसरहून आलेल्या शिख बांधवांचा रस्त्यामुळे आक्रोश

**दैनिक युवक आधार**
**.तालूका प्रतिनिधीः महादेव उप्पे**

गुत्तेदाराची मनमानी,हणेगाव ते लोणी अडीच किलोमिटरचा रस्ता कधी बनणार,फेब्रुवारी महिन्यात चालू झालेल्या रस्त्याचे शेवट कधी,गुत्तेदार मस्त नागरिक त्रस्त

– देगलूर ते हणेगाव हा रस्ता नांदेड देगलूर बिदर मार्गे हैद्राबाद जाणारा मोठा रस्ता असून या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या भागातील कावळगाव,करडखेड मरखेल दावणगीर लोणी हणेगाव अशा गावातील नागरिकांनी व्यवसाय थाटून आपली उपजिविका भागवण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत







परंतू मागील काही वर्षापासून देगलूर ते हणेगाव रस्त्याची दयनिय अवस्था झाल्यामुळे या भागातील आर्थिक जडण घडण मोठ्या प्रमाणात खुंटला आहे,तसेच या भागातील नागरिकांना प्रवास करणे म्हणजे तारेवरची कसरत केल्यासारखी आहे व आपला जीव मुठीत घेऊन जगत आहेत.मागील फेब्रवारी महिन्यात हणेगाव ते लोणी रस्त्याच्या कामाला सुरुवात केली असून या रस्त्याचे काम आजतागायत झाले नसल्यामुळे या रस्त्यावर चालणाऱ्या दुचाकी वाहनांना मोठ्याप्रमाणात त्रास होत असून याची दखल घेतली जात नाही व या भागातील लोकप्रतिनिधीसुद्धा अशा कामाकडे गांभीर्य घेत नसल्यामुळे नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

या रस्त्यावर पंजाब अमृतसर हरियाणा मध्यप्रदेश दिल्ली अहमदनगर राजस्थान अशा अनेक राज्यातून नांदेड येथील गुरुगोविदसिंग हुजूर साहेब यांच्या दर्शनासाठी येतात तसेच कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा या ठिकाणी( गुरु नानक) नानक जिरा सिख बांधवांचे मोठे देवस्थान असून याच रस्त्यावरून प्रवास करतात.

परंतू या रस्त्यावरून सिख बांधव प्रवास करीत असताना या रस्त्याविषयी असंतोष व्यक्त करून सरकार व या भागातील लोकप्रतिनिधी या रस्त्याविषयी का गांभिर्य घेत नाहीत असे मत व्यक्त केले.

आम्ही किमान दोन हजार तीन हजार ते चार हजार किलोमिटर एवढ्या लांबून हुजूर साहेब नानक जिरा येथे दर्शनासाठी येतो.एवढा मोठा लांबचा पल्ला पार करून आल्यानंतर सुद्धा आम्हाला त्रास होत नाही परंतू देगलूर ते हणेगाव बॉर्डरपर्यंतचा प्रवास हा जिवघेणा असल्याचे दिसून येत आहे.मी कॅ. बलबिर सिंग जिल्हा हूशीयारपूर,पंजाब येथील रहिवाशी असून मी इ.स.१९७१ साली सैन्यात भरती झालो.व इ.स.२००२ मध्ये निवृत्त झालो. इ.स.१९७१ सालीचा युद्ध असो कि कारगील युद्ध असो त्या युद्धात एवढा त्रास झाला नाही परंतू या रस्तामुळे खुप त्रास होत आहे.मी पंचवीस वर्षापुर्वी आलो होतो तेव्हा सुद्धा रस्त्याची हिच परिस्थिती होती आजसुद्धा या रस्त्याची परिस्थिती तिच असल्यामुळे माझ्या मनाला खुप मोठा त्रास झाला.

**कॅ.बलबिर सिंग**
**जिल्हाःहुशियारपूर,पंजाब**
**रिटायर आर्मी**

आम्ही आमच्या परिवारासोबत दरवर्षी नांदेड येथील गुरुगोविंदसिंगजी हूजूर साहेब व कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा येथील नानक जिरा येथे दर्शनासाठी येत असतो परंतू या रस्त्यामुळे आम्हाला खुप त्रास होतो.यासाठी माझी या सरकारला एकच विनंती आहे की,हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावे.

**मंजित सिंग**
**जिल्हाःतरंगतार पंजाब**

# राष्ट्रवादी चे माजी नगरसेवक श्री. बाबाजी पाटील यांचा हजारो कार्यकर्त्यानसह शिवसेनेत प्रवेश.

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत,**
**कल्याण ग्रामिण प्रतिनिधी.**

ठाणे महानगरपालिकेतील वार्ड क्रमांक २९ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) माजी नगरसेवक श्री.बाबाजी पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिट्ठी देत दि.२५ऑगस्ट रोजी शिवसेनेत (शिंदे गट) रोजी त्यांचे पुत्र श्री.आकाश बाबाजी पाटील, श्री. नथू पाटील, श्री. शिवाजी म्हात्रे, श्री.सावंत ठाकूर, श्री. राजेश म्हात्रे, श्री.विनायक पाटील, श्री. उदय पावशे, श्री.देवा पाटील, श्री. तुषार म्हात्रे,आणि शेकडो कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.श्री.बाबाजी पाटील यांनी पक्ष सोडल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला येणाऱ्या आगामी महानगर पालिकेच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात फटका बसू शकतो.बाबाजी पाटील यांची कार्यपद्धती आणि तगडा असा जनसंपर्क यामुळे शिवसेनेला याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. शिवसेनेचे मुख्य नेते आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश करण्यात आलाश्री. बाबाजी पाटील यांनी आपले पुत्र श्री.आकाश पाटील आणि शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेचा झेंडा हाती घेतला.श्री.एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, कल्याण ग्रामीणचे आमदार श्री. राजेश मोरे,कल्याण जिल्हा प्रमुख श्री.राजेश कदम,शिवसेना सचिव श्री.राम रेपाळे दिवा शहर अध्यक्ष श्री.रमाकांत मढवी आणि हजारो शिवसैनिक उपस्थित होते.



# श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अझहर धनसे यांच्याकडे रायगड जिल्हा संघटक पदाची अतिरिक्त जबाबदारी....

**दैनिक युवक आधार**
**रायगड वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाने श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अझहर धनसे यांना आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्याकडे आता 'रायगड जिल्हा संघटक' पदाची धुराही देण्यात आली असून, त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर दुहेरी विश्वास व्यक्त केला आहे.

ही महत्त्वपूर्ण नियुक्ती रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जाहीर केली. गेल्या काही वर्षांपासून अझहर धनसे यांनी म्हसळा तालुका कार्याध्यक्ष, म्हसळा तालुका अध्यक्ष, श्री वर्धन विधानसभा अध्यक्ष म्हणून केलेल्या कामाचा ठसा उमटवला आहे. केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिक



आणि जनसामान्यांशी संबंधित प्रश्नांवर त्यांनी कायमच सक्रिय भूमिका घेतली आहे. त्यांचे जनसंपर्क अभियान, विविध लोकोपयोगी कार्यक्रम आणि पक्ष वाढीसाठीचे प्रयत्न यामुळे त्यांच्या कामाची चर्चा केवळ श्रीवर्धनमध्येच नव्हे, तर संपूर्ण रायगड जिल्ह्यात आणि राज्यभरात होत आहे.

कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण :

अझहर धनसे यांच्या या नवीन नियुक्तीमुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. अनेक कार्यकर्त्यांनी सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून त्यांचे अभिनंदन केले आहे. स्थानिक कार्यकर्ते नरेंद्र धोत्रे यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले, "अझहर भाईंनी नेहमीच कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले आहे. त्यांची ही नियुक्ती आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. आता त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही रायगड जिल्ह्यात पक्षाचे काम अधिक जोमाने करू."

**पक्षाची पुढील रणनीती –**

या निवडीबाबत बोलताना जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, "अझहर धनसे हे एक कार्यक्षम आणि युवा नेतृत्व आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात त्यांनी संघटनेला मोठे बळ दिले आहे. त्यांची ही कार्यपद्धती आता संपूर्ण रायगड जिल्ह्यात पोहोचवणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे संघटक पदाची जबाबदारी दिल्याने जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पक्ष अधिक मजबूत होईल आणि आगामी निवडणुकांमध्ये आपल्याला मोठा फायदा होईल, असा आम्हाला विश्वास आहे."

अझहर धनसे यांची प्रतिक्रिया :

या नियुक्तीनंतर अझहर धनसे यांनीही आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, "पक्ष नेतृत्वाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. विशेषतः आदरणीय शरदचंद्र पवार साहेब, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय शशिकांत शिंदे साहेब आणि रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची ही संधी मिळाली आहे. श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रातील पाच तालुक्यांमध्ये आम्ही जे काम केले, तेच काम आता संपूर्ण रायगड जिल्ह्यात पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला सोबत घेऊन, लोकांचे प्रश्न सोडवून पक्ष संघटना आणखी मजबूत करणे हेच माझे उद्दिष्ट असेल."

अझहर धनसे यांच्यावर सोपवलेली ही नवीन जबाबदारी आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षासाठी रायगड जिल्ह्यात गेम चेंजर ठरू शकते, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत होऊन जनमानसात आपली पकड कायम ठेवेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



शेतकरी कामगार पक्षाच्या प्रभाग क्र 2 च्या माजी नगरसेविका सौ. उज्वला विजय पाटील यांच्या मागणीवरून तोंडरे गणेश विसर्जन घाटावर पेवर ब्लॉकचे कामाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी त्यांच्यासोबत तोंडरे गावचे माजी सरपंच बेंदर पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य गोटीराम पाटील, ह. भ. प. दिलीप पाटील, मनसेचे प्रभाग क्र. 2 विभाग अध्येक्ष विश्वनाथ पाटील, प्रभाग क्रमांक 2 शेकाप महिला अध्यक्षा रेखा अरुण पाटील,प्रभाग क्र. 2 कार्याध्यक्ष गुरुनाथ पाटील, शिवसेना कार्यकर्ते महेंद्र पाटील, सांस्कृतिक सेल उपाध्यक्ष विनायक पाटील, रामदास पाटील, अशोक पाटील, तसेच पुरोगामी युवक संघटना पनवेल महानगरपालिका जिल्हा उपाध्यक्ष विजय पाटील यांच्या उपस्थित उदघाट्न संपन्न झाले.

# विहिरगांव येथील गावकऱ्यांचे वडकी महावितरण अभियंत्याला निवेदन

## साहेब आमच्या समस्याकडे लक्ष दयाल का......??

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

राळेगांवः-तालुक्यातील विहिरगांव येते गेल्या चार पाच दिवसा पासून लाईन असून गावकरी अंधारात आहे गावातील डिपी चा टान्सफार्म जाऊन असून वडकी महावितरण ला वारंवार माहिती देऊन सुद्धा अधिकारी लक्ष देत नसल्यामुळे गावाकऱ्याला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे याला जबादार कोण तरी पण वरिष्ठ अधिकारी यांच दुर्लक्ष होत असल्याच दिसत आहे,वारंवार विद्युत खंडित होत असल्यामुळे विहिरगाव येथील नागरिक त्रस्त विद्युत सतत खंडित होत असल्यामुळे गावातील नागरिकांनी महावितरण कार्यालय वडकी



यांच्यावर संताप व्यक्त केला आहे आणि वडकी महावितरण अभियंत्याला निवेदन देण्यात आले विद्युत उपकरणे लहान मुलांना होणारा त्रास तसेच आजारी वय वृद्ध व्यक्तींना होणारा त्रास गावातील शेतकऱ्याच्या ऑनलाईन कामामध्ये येत असून कर्मचाऱ्याचे दुर्लक्ष होत असून गावातील विद्युत प्रवाहच्या पेठ्या अस्ता व्येस झाल्या आहे तरी त्याकडे सुद्धा दुर्लक्ष आहे गावातील एखादी विद्युत प्रवाह गेला असता गावातील नागरिकांना स्वतः जाऊन फेज टाकावा लागतो आपल्या जीवावर बेतून हे सर्व काम करावे लागत आहे यामध्ये काही जीवितहानी झाल्यास याला जबाबदार कोण या सर्व बाबीचा आढावा घेऊन त्वरित यावर कार्यवाही करावी असे विहिरगांव येथील नागरिकांनी अभियंता वडकी यांना निवेदनातून दिला आहे त्या वेळी गावातील सरपंच सी.एस. मेश्राम,संजय आत्राम,राजू मेश्राम,हिम्मत कुळसंगे,प्रकाश सिडाम,महादेव सिडाम,दिनेश सिडाम,बारबा मूर्खे,अरविंद कोडापे, मनोहर मेटकर,ज्ञानेश्वर सुतार, सुषमा मेश्राम,सोनू सिडाम,अनुसया घुगरे इत्यादी नागरिक उपस्थित होते.

# एक गाव एक गणपती साठी तावशी गाव सज्ज

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

तावशी ता इंदापूर येथे एक गाव एक गणपती या संकल्पनेला आधारून पूर्ण गावाने एक गणपती बसवण्याचा एक ऐतिहासिक निर्णय वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला

इंदापूर तालुक्यामधील 39 गावे वालचंदनगर पोलीस स्टेशन चा परिसर आहे यामधील तावशी हे गाव सामाजिक उपक्रम व सामाजिक बांधिलकी जपणारे गाव म्हणून प्रसिद्ध आहे सदर गावामध्ये शांतता व सुव्यवस्था वाढीस लागावी म्हणून त्यांनी आपल्या गावामध्ये फक्त एक गणपती बसवण्याचा निर्धार केला

यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर यांनी गणपतीचे दहा दिवस विविध दहा उपक्रम यांनी यंदाचा गणेशोत्सव साजरा करण्याचा



गावकऱ्यांना आवाहन केले यामध्ये आरोग्य शिबिर नेत्र तपासणी शिबिर हृदयरोग शिबिर तसेच रक्तदान शिबिर तसेच सामाजिक कार्यक्रमांमध्ये भजन कीर्तन भारुड इतर व्याख्याने या स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित करून भरघोस प्रतिसाद व गावांना एक नवीन विकासाची चालना देऊन गावचा विकास करावा तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश येण्यासाठी गावामध्ये ग्रंथालय व उभारावी हे देखील आवाहन त्यांनी या माध्यमातून केले वृक्षारोपण आणि देशी झाडांचे वृक्ष वृक्षारोपण व संगोपन त्याचबरोबर घेण्यात यावा शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करावेत विसर्जन करते वेळी डीजे सामान्य व पारंपारिक वाद्यांच्या गजरात गणपतीच्या आवाहन विसर्जन करावे गावामध्ये या वर्गणीच्या माध्यमातून सिसिटीव्ही बसवण्यात यावेत तसेच हा उत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन यावेळी केले जर लेझर लाईट यादरम्यान सापडल्या तर त्याच्यावरती गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्यात येईल असे यावेळी स्पष्ट केले मिरवणुकीसाठी पोलीस पूर्व परवाना घ्यावा. धार्मिक भावना दुखावणारे, इतर जाती-धर्मांना लक्ष्य करणारे फलक, भाषणे, नारेबाजी टाळावी. जुगार, मद्यपान, अश्लील नाचगाणी अशा कोणत्याही अवैध प्रकारांना मंडपात किंवा परिसरात परवानगी देऊ नये. तावशी गावामधील ग्रामपंचायत सदस्य राहुल व्होरकटे पोलीस पाटील सागर खरात तंटामुक्ती अध्यक्ष अंकुश आवळे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश चव्हाण, सकाळचे पत्रकार अभिजीत देशपांडे त्याचबरोबर गावांमधील मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते पोलीस हवालदार अमोल गायकवाड त्याचबरोबर अविष्कार शिंगाडे हे उपस्थित होते.

# वरुड चक्रपान येथे डॉ अण्णाभाऊ साठे मोठ्या उत्साहात जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**सेनगाव ( प्रतिनिधी)**

सेनगाव तालुक्यात वरुड चक्रपान दिनांक 25 ऑगस्ट 2025 रोजी सोमवारी येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे 105 जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. असून सकाळी 9:00 वाजता पि.के जोगदंड सर ( माजी पर्यवेक्षक ) यांच्या हस्ते ध्वजरोहन करून. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय उपसरपंच सुधाकर आदमने कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कांतराव कोटकर भाजपा ताअध्यक्ष श्री पि.के जोगदंड मा पर्यवेक्षक ज्ञानेश्वर विद्यालय वरुड चक्रपान उत्तम वाकळे पोलीस पाटील सुधाकर राऊत( प्राचार्य ज्ञानेश्वर विद्यालय वरुड चक्रपान ) के.जी कोटकर (लेखक) कोरडे सर (जि प प्रा शाळा वरुड चक्रपान ) के.के कोटकर पाटील



सर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे समिती =अध्यक्ष ओमकार कांबळे उपाध्यक्ष) केतन अवचार (सचिव )उमेश अवचार सचिव सदस्य मोहन अवचार राजू वैरागड (पत्रकार ) केशव अवचार डॉ भागवत वैरागड गजानन कांबळे अभिषेक कांबळे संकेत अवचार प्रवीण अवचार सुनील कांबळे किसन अवसार निशिकांत अवचार उमेश अवचार यांनी आभार प्रदर्शन केले. असून आयोजक मंडळाच्या वतीने सर्व मातंग समाजाची बांधव आणि भगिनी गावकरी मंडळी उपस्थित होते.

# रिसोड तालुक्यातील अतिवृष्टीतील नुकसानग्रस्त भागाला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांची भेट.

## रिसोड नेतसा,जायखेड येथे केली पाहणी.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**

**रिसोडः-वाशिम** तत्कालीन जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांच्या प्रशासकीय बदलीनंतर नुकतेच रुजू झालेले जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी रिसोड तालुक्यातील अतिवृष्टीतील नुकसान ग्रस्त भागाची 25. ऑगस्ट रोजी नेतसा,जायखेड या गावांना भेट देत पाहणी केली.यावेळी एसडीओ वैशाली देवकर मॅडम तहसीलदार तेजनकर सोबत होत्या. रिसोड तालुक्यातील बहुतांश गावात अतिवृष्टीसह चार वेळा ढगफुटीचा फटका बसल्याने शेतातील उभ्या पिकासह शेती उपयोगी ठिबक स्पिंकलर पाईप मोटार पंपा सह मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या आघाताने रिसोड तालुक्यातील शेतकरी हातबल झाल्यानंतर वाशिमचे पालकमंत्री व महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे मामा. व खासदार अनुप धोत्रे. तसेच आमदार अमित झनक यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सांत्वन केले. परंतु महसूल विभागाचे पीक पंचनामे सुरू आहेत. या पंचनाम्यांना वेग देण्यासाठी त्याचप्रमाणे नुकसान ग्रस्त शेतकरी पंचनामा पासून वंचित राहणार नाही यासाठी व



एसडीओ वैशाली देवकर मॅडम. व तहसीलदार तेजनकर प्रयत्न करीत आहेत. परंतु जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या दौऱ्याने नक्कीच नुकसानग्रस्त व वंचित शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळण्याचे अशा पल्लवीत झाल्या आहेत. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर. व एसडीओ वैशाली देवकर मॅडम. यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. तर शेतकऱ्यांनी अतिवृष्टीतील झालेल्या नुकसानीची आपबीती यावेळी मांडली. यावेळी महसूल विभाग कृषी विभाग तसेच शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची राज्यात यशस्वी वाटचाल

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील** : गर्भवती महिला व स्तनदा मातेचे पोषण आणि आरोग्य जपल्यास पुढील पिढी सुदृढ होईल. तसेच मुलींच्या जन्माबाबत सकारात्मकता वाढावी या उद्देशाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येते. एकात्मिक बाल विकास प्रकल्पामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या यशस्वी वाटचालीतून मातांचे आरोग्य, कुटुंबाचा आनंद आणि समाजाचा विकास साधत राज्याचा विकास साधता येणार आहे.

प्रधानमंत्री मातृवंदना योजनेअंतर्गत ३६ जिल्ह्यांचे जिल्हा नोडल अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच क्षेत्रीय स्तरावरच्या मुख्य सेविकांचे मॅपिंग १०० टक्के पूर्ण झाले आहे. या वर्षासाठी ४० हजार नोंदणी करण्यात आली आहे. उर्वरित उद्दीष्ट लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ वर्षासाठी ५ लाख ७० हजार उद्दिष्ट दिले असून, ते कालमर्यादेत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी योजनेअंतर्गत असेलल्या नियमांची पूर्तता आणि प्रलंबित महिला लाभार्थ्यांना त्यांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच २०१७ पासून ज्या महिला योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे आल्या नाहीत, अशा महिलांपर्यंत अंगणवाडी महिला अथवा आशा वर्कर यांच्या सहायाने लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाकडून राज्यात ही योजना राबविण्यात येत होती. त्यांनतर २०१७ पासून ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात होती. २०१७ पासून आजतागायत ४६ लाख २९ हजार ११९ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला.

जिल्ह्यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत ३६ जिल्ह्यात, ५५३ प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, ३,८९९ बीट लेवलच्या मुख्य सेविकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. मॅपिंगचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. लवकरच अंगणवाडी स्तरावरील मॅपिंग पूर्ण करण्यात येणार आहे.

गर्भवती व स्तनदा मातांना सकस आहार देणे, गरोदरपणात काम थांबल्यामुळे आर्थिक नुकसानीसाठी मजुरी भरपाई देणे, दुसरे मूल हे मुलगी जन्मास आले असेल तर अतिरिक्त आर्थिक प्रोत्साहन देऊन मुलीबद्दल सकारात्मक दृष्टीकोनास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. मुलीच्या जन्माबद्दल सकारात्मक दृष्टीकोन वाढावा यासाठी गर्भधारणेच्या नोंदणीपासून सहा महिन्याच्या आत प्रसूतीपूर्व तपासणीसाठी महिलेला ३ हजार रूपये देण्यात येतात. तर बाळाच्या जन्मानोंदणी नंतर दोन हजार रूपये देण्यात येतात. म्हणजेच पहिल्या अपत्यासाठी पाच हजार रूपये देण्यात येतात. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर सहा हजार रूपये देण्यात येतात. ज्या कुटुबाचे उत्पन्न प्रतिवर्ष आठ लाख पेक्षा कमी असेल, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, अंशत: ४० टक्के किंवा पूर्ण अपंग, बीपीएल शिधापत्रिकाधारक, आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत लाभार्थी , ई-श्रम कार्ड धारक, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी शेतकरी, मनरेगा जॉब कार्डधारक, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती, अन्नसुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत रेशनींग कार्डधारक यापैकी किमान एक दस्ताऐवज असल्यास या योजनेचा लाभ घेता येतो. महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या अंगणवाडी केंद्रात संपर्क साधायचा आहे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र, किंवा उपजिल्हा किंवा जिल्हा रूग्णालयात अर्ज करू शकतात.

# माहिती अधिकार समितीतर्फे आदर्श ग्रामसेवक शेख यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील लाकडी निंबोडी गावचे ग्रामविकास अधिकारी मा.इसाक शेख यांना पुणे जिल्हा परिषद पुणे यांच्याकडून आदर्श ग्रामसेवक म्हणून पुरस्कार घोषित केला असल्यामुळे इंदापूर तालुक्यातील माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे इंदापूर तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय यांच्या माध्यमातून त्यांचा सणसर ग्रामपंचायत कार्यालयात सत्कार करण्यात आला.यावेळी सणसर गावचे सरपंच यशवंत नरुटे, सणसरचे ग्रामसेवक सचिन पवार लासुर्णे गावचे ग्रामसेवक स्वप्नील गायकवाड तावशीचे ग्रामसेवक सतीश गायकवाड कुंभार भाऊसाहेब शेतकरी संघटनेचे निंबोडी गावचे युवा कार्यकर्ते मनोज घोळवे राहूल घोळवे सणसर गावातील माहिती अधिकार समितीचे कार्यकर्ते सुनील निंबाळकर किरण गायकवाड पै बबन दादा सोनवणे आबासाहेब भोईटे सनी माने पंकज भिसे बाला पाटील विक्रम भैय्या निंबाळकर हमीद तांबोळी इकबाल काझी प्रविण शिंदे योगेश शेलार व माहिती अधिकार समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# शिवछत्रपती तरुण मित्र मंडळ शिंदवणे हवेली ग्रामीण मध्ये प्रथम पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी :पुणे ग्रामीण पोलीस दल यांच्या वतीने बारामती येथे गणेश उत्सव पुरस्कार वितरण समारंभ सोहळा संपन्न झाला यावेळी पुणे जिल्ह्यातील जवळपास १००० मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते यावेळी प्रत्येक तालुक्यातील प्रथम, द्वितीय, तृतीय, क्रमांक प्रमाणे असे कायदा सुव्यवस्था व सामाजिक उपक्रम राबविणार्या मंडळांचा श्री संदिपसिंह गिल्ल (पोलिस अधीक्षक पुणे ग्रामीण) श्री गणेश बिराजदार (अप्पर पोलिस अधीक्षक पुणे ग्रामीण) तहसीलदार बारामती प्रांत अधिकारी व सर्व मान्यवर यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. या वेळी हवेली तालुक्यातील ग्रामीण भागात प्रथम क्रमांक शिवछत्रपती तरुण मंडळ (शिंदवणे) यांना मिळाला. तर द्वितीय क्रमांक श्रीकृष्ण तरुण मंडळ (ऊरुळी कांचन) तृतीय क्रमांक कोहिनूर मित्रमंडळ (ऊरुळी कांचन)यांना मिळाला

यावेळी शिवछत्रपती तरुण मंडळ चे सर्व पदाधिकारी मंडळाचे अध्यक्ष श्री तुषार सुभाष महाडिक
ऊपाध्यक्ष श्री अशोक एकनाथ महाडिक
कार्यअध्यक्ष श्री सचिन बापु शिंदे
सहकार्यअध्यक्ष श्री महेश गोरक्ष महाडिक
खजिनदार श्री सचिन जालिंदर महाडिक



सहखजिनदार श्री पांडुरंग संभाजी महाडिक
सचिव श्री महेश भुजंग महाडिक
सहसचिव श्री अंकुश बापु महाडिक
ऊत्सवप्रमुख श्री गणेश भुजंग महाडिक
कु संकेत दिलिप नलवडे
कु अदित्य भरत दिडभाई
कु तेजस आबासो महाडिक ऊपस्थित होते

३१ वर्षांची परंपरा जपत असताना शिवछत्रपती तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षी फेस्टिवलचे आयोजन केले जाते तसेच सर्व सामाजिक उपक्रम राबविले जातात मंडळांचे आधारस्तंभ राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पुणे जिल्हा श्री आण्णा महाडिक व आयोजक शिंदवणे गावचे तंटामुक्ती समिती अध्यक्ष श्री गणेशदादा महाडिक यांच्या पाठबळावर मंडळ छत्रपती शिवाजी महाराजांचा विचारांचा वारसा व समाज सेवा अविरत पणे पुढे चालु ठेवणार असे अध्यक्ष श्री तुषार सुभाष महाडिक यांनी सांगितले!

# वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून नेतृत्व गुण विकसित:- मुख्याध्यापिका नंदिता गांगुली

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी**

रोटरी व इनर क्लब देवळाली यांचे संयुक्त विद्यमाने गेल्या सात दशकापासून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात येत असून यात देवळाली शहर व ग्रामीण परिसरातील विध्यार्थी सहभागी होतात. मराठी हिंदी इंग्लिश या तिनही भाषात विविध विषयांवर स्पर्धा सुभाष स्कुल येथे करण्यात आली.तसेच सामान्य ज्ञानावर् प्रश्न विचारण्यात येऊन यशस्वी विध्यर्थाना बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमांच्या मुख्य अतिथी जेम्स स्कूलच्या प्रिन्सिपल नंदिता गागुली यानी उपक्रमाचे कौतुक करत प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी आत्मविश्वास असणे गरजेचे आहे.यातूनच नेतृवगुण विकसित होतात असे प्रतिपादन केले. या तिनही स्पर्थेत देवळाली हायस्कुल् इंग्लिश मीडियम शाळेस प्रथम पारितोषिक तर वासुदेव अथनी इंग्लिश मीडियम शाळेस द्वितीय पारितोषिक मिळाले.

या कार्यक्रमांस रोटरी इनरव्हील अध्यक्ष सचिव सभासद जजेस सर्व शाळांचे शिक्षक पालक व स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# डॉ.पंकज भोयर भंडारा जिल्ह्याचे नवे पालकमंत्री

दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे



भंडारा -सामान्य प्रशासन विभागाच्या काल दिनांक 25 ऑगस्ट 2025 च्या शासन निर्णयानुसार भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून राज्यमंत्री गृह (ग्रामीण) गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खणीकर्म डॉ पंकज कांचन राजेश भोयर यांची नियुक्ती शासनाने केली आहे. त्याच आदेशान्वये भंडारा जिल्ह्याचे पूर्व पालकमंत्री संजय सावकारे यांना बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री पद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# देव्हाडीतील जुगाराचा डाव उधळला; स्थानिक गुन्हे शाखेच्या धडक कारवाईत तिघे जेरबंद, अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त!

**जिल्हा प्रतिनिधी**
**तुमसर :-** तुमसर तालुक्यातील देव्हाडी परिसरात सुरू असलेल्या एका अवैध जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने यशस्वी धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना रंगेहाथ पकडले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम, महागडे मोबाईल फोन आणि मोटरसायकली असा एकूण २,५९,१३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध धंद्यांचे धाबे दणाणले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील यांना



देव्हाडी-माडगी रोड परिसरात काही इसम पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळत

असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांच्या पथकाने सापळा रचून सदर ठिकाणी छापा टाकला असता, तीन जण जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी तात्काळ तिघांनाही ताब्यात घेतले असून त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत: शरद राजकुमार खांडेकर (वय २७) विरेन्द्र सुभाष शहारे (वय २८) शामकुमार रामभाऊ मडावी (वय ३८) हे सर्वजण देव्हाडी, ता. तुमसर येथील रहिवासी आहेत. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून अंगझडतीत मिळालेली रोख रक्कम, जुगाराच्या डावावर लावलेली रक्कम, तीन महागडे मोबाईल फोन्स (किंमत ६२,००० रु.), दोन मोटरसायकली (किंमत १,९५,००० रु.) आणि ५२ पत्त्यांचा कॅट असा एकूण २,५९,१३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील यांच्या फिर्यादीवरून तुमसर पोलीस स्टेशनमध्ये आरोपींविरुद्ध गुन्हा क्रमांक ५६८/२०२५ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२ (अ) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कौतुकास्पद कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे आणि पोलीस निरीक्षक चिचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास तुमसर पोलीस स्टेशनचे अधिकारी करत आहेत.

# धामणगावात जुगार अड्ड्यावर अंभोरा पोलिसांची धडक कारवाई!

## १२ जुगारी गजाआड, तब्बल ९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रक्ताटे आष्टी (प्रतिनिधी):**

अंभोरा पोलिसांनी सोमवारी पहाटे मिळालेल्या गुप्त माहितीवरून धामणगाव शिवारातील शेतामध्ये चालू असलेल्या जुगार अड्ड्यावर सापळा रचून धाड टाकली. या कारवाईत तब्बल १२ जुगारी रंगेहाथ पकडले गेले. पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी व जुगाराचे साहित्य असा एकूण ८ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांची दमदार कामगिरी

या धाडीस पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण




हनपुडे यांचे मार्गदर्शन लाभले.

कारवाईत सपोनि मगेश साळवे, पीएसआय चंद्रकांत तावरे, हवालदार मुकुंद एकशिंगे, अंमलदार शिवदास केदार, सतीश पैठणे यांनी विशेष भूमिका बजावली.

पुढील तपासाची धुरा सहायक फौजदार सोपान येवले यांनी सांभाळली आहे.

नागरिकांचा सवाल

या कारवाईनंतर नागरिकांतून पोलिसांचे कौतुक होत असले तरी प्रश्नही उपस्थित होत आहेत.

धामणगावसह परिसरातील जुगार अड्डे नेमके केव्हा बंद होणार? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून विचारला जात आहे.

# तंटामुक्ती अध्यक्षपदी भास्कर काचोळे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

**राळेगावः**-तालुक्यातील वनोजा येथे तहकूब सभा आयोजित केली होती सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली,त्यास अनुसरून तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून भास्कर सखाराम काचोळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली, भास्कर काचोळे यांना या आधी तंटामुक्ती गाव पुरस्काराने दोन लाखांचे मानकरी ठरले आहेत तरी त्यांनी दोन वर्ष तंटामुक्ती अध्यक्ष हे पद भूषविले असून तिसर्यांदा संधी मिळाली आहे तरी त्यांनी गावाशी योग्य त्या पद्धतीने सहकार्य लाभेल अशी त्यांनी सांगितले आहे,तरी नवनिर्वाचित ग्रामसेवक सुबोध चांगले यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी सरपंच मालु कोटनाके,उपसरपंच प्रभाकर दांडेकर,चंद्रशेखर उगेमुगे(सदस्य),प्रफुल तायवाडे(सदस्य),मंगेश येनोरकर(संगणक परिचालक),अमरदीप नगराळे(शिपाई) जितेंद्र खोडे(पत्रकार),मनोज




येनोरकर,हनूमान मडावी, प्रल्हाद मडावी, बापुराव नैताम,विशाल सावध,उत्तम गुडधे,छत्रपाल सावध,गजानन नागपूरे,दिलीप बुरले,शुभम गुजरकर, सिध्दार्थ नगराळे,देवानंद पाटील,संध्या पाटील,स्वाती टेकाम,मनिषा काटेकर इत्यादी सभासद हजर होते.